ठराव

नमुना ''अ''

नियम 3 पहा

कार्यालय नगर परीषद ,यवतमाळ

सभा क्र. ६ /न.प.य./२०२६

दिनांक-१५ /४/२०२६

// सर्वसाधारण सभेची सुचना //

प्रती,

श्री./श्रीमती -----------------------------------------------------------------

उपाध्यक्ष/सभापती/सदस्य/सदस्या ----------------------- समिती

नगर परिषद , यवतमाळ

आपणास या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, नगर परीषद यवतमाळ ची सर्वसाधारण सभा गुरुवार दि. 23/ ४/ /२०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वा.नगर परिषद नगर भवन सभागृह येथे नमुना'अ' जोडपत्रातील विषयावर चर्चा करुन ठराव पारीत करण्याकरीता भरवीण्यात येत आहे.

तरी या सभेला आपणास उपस्थित राहण्याची विनंती करण्यात येत आहे.

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके )
अध्यक्ष
नगर परिषद, यवतमाळ

---

// नमुना ''अ'' चे जोडपत्र //

दिनांक23 / ४ /२०२६ रोजीचे सर्वसाधारण सभेत चर्चेला घेण्यात येणारे विषय –

विषय क्र.१ - मागील सभा दि.९/२/२०२६ व स्थगीत सभा दि.१२/२/२०२६ रोजीचे ठराव वाचुन कायम करणे.

विषय क्र.२ - नगर परिषद यवतमाळ हद्दीत आदीवासी समाज भवन बांधण्याकरीता प्राप्त निधीतुन महसुल विभागाची जागा भुसंपादन करण्याबाबत. सभेच्या माहीतीस्तव व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.३ - नगर परिषद येथील सर्व नगर परिषद शाळेत परिसरात जुन/जुलै २०२६ पुर्वी वृक्ष लागवड/परसबाग तयार करणेबाबत विचार विनिमय करणे.

विषय क्र.४ – नगर परिषद शाळेत इंग्रजी माध्यम पहिला वर्ग ते दहावी पर्यत सुरु करण्याबाबत विचार विनिमय करणे.

विषय क्र.५ – नगर परिषद शाळेत केजी १ केजी २ वर्ग सुरु करणेबाबत विचार विनिमय करणे.

विषय क्र.६ - यवतमाळ नगर परिषदेच्या सर्व शाळामध्ये सेमी इंग्रजी वर्ग सुरु करणेबाबत विचार विनिमय करणे.

विषय क्र.७ -नगर परिषद यवतमाळ बांधकाम विभागातील सेवानिवृत्त लिपीक यांना बांधकाम विभागांत मानधन तत्वावर नेमणूक करण्याबाबतचा विषय चर्चेकरीता सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्याबाबत.

विषय क्र.८ - नगर परिषद यवतमाळ स्वच्छता विभाग अंतर्गत मान्सुनपुर्व तयारीसाठी नगर परिषद हद्दीतील मोठया नाल्याची सफाई करण्याबाबत.

विषय क्र.९ - नगर परिषद यवतमाळ हद्दीतील मोठया विसर्जन विहीरीचा गाळ काढून पुर्ण साफसफाई करण्याबाबत.

विषय क्र.१० -नगर परिषद यवतमाळ बांधकाम विभाग मार्फत तांत्रिक सल्लागार नेमण्यास मान्यता देण्याबाबत चा विषय चर्चेकरीता सर्वसाधारण सभेसमोर ठेवणेबाबत.

विषय क्र.११ - नगर परिषद बांधकाम विभागामध्ये कंत्राटी अभियंता यांचे ई-निविदा प्रक्रीया राबवून मानधन तत्वावर नेमणूक करण्यास मान्यता देण्याबाबत चा विषय चर्चेकरीता सर्वसाधारण सभेसमोर ठेवणेबाबत.

विषय क्र.१२ - यवतमाळ नगर परिषद हद्दीतील स.क्र.५१ मौजा यवतमाळ येथील जागा भूसंपादन करण्याबाबत.

विषय क्र.१३ -नगरपरिषद यवतमाळ येथील विविध विभागातर्गत मागील वर्षात थकीत असलेल्या देयकाची अदायगी करणेबाबत सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.१४ - नगर परिषद यवतमाळ हद्दीतील आदीवासी विकास निधी अंतर्गत ठक्करबापा योजना व शहरी योजनेमधुन स्ट्रीट लाईट बसविण्याचे कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

विषय क्र.१५- स्वच्छता विभागाकरीता भाडेतत्वावर अतीरीक्त जेसीबी मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत.

विषय क्र.१६- स्वराज्याची दुसरी महाराणी येसुबाई या नावाने यवतमाळ नगर परिषद हद्दीतील दारव्हा रोडवरील वर्मा ट्रॅक्टर शेजारील चौकाचे नामकरण करण्याकरीता सभेच्या माहीतीस्तव व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.१७- यवतमाळ नगर परिषद हद्दीमध्ये दर्डा नगर येथील चेक पोस्ट नाका क्रांतीदूत सेवानिवृत्त पोलीस कल्याणकारी सेवाभावी न्यास,यवतमाळ या संघटनेकरीता तात्पुरत्या स्वरुपात वापरण्यास परवानगी देण्याकरिता मा.सर्वसाधारण समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करण्याबाबत.

विषय क्र.१८- यवतमाळ नगर परिषद हद्दीमध्ये प्रभाग क्र.६ मधील जिल्हा परिषद कॉलनी मधील नगर परिषद चे सभागृह देखरेखीकरिता हस्तांतरण करण्याकरिता मंजुरी घेण्यासाठी मा.सर्वसाधारण समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करण्याबाबत.

विषय क्र.१९- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.२८ मधील उमरसरा यवतमाळ तलावाचे सौदर्यीकरण करणेबाबतचे काम करण्यास्तव सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास सादर करणेबाबत.

विषय क्र.२०- नगर परिषद निधी अंतर्गत सन २०२६-२७ या आर्थीक वर्षात यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.१ ते २९ मध्ये विविध ठिकाणी असलेल्या उद्यानाची देखभाल दुरुस्तीचे काम करण्यास्तव तसेच न.प.मालकीच्या खुल्या जागेवर उद्यान तयार करुन त्याचे देखभाल व दुरुस्तीचे काम करण्यास्तव सदर कामास निविदा प्रक्रीया करण्यास व त्याबाबत होणा-या खर्चास नगर परिषद निधी अंतर्गत करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्याबाबत.

विषय क्र.२१- नगर परिषद मधील बांधकाम विभागातील तसेच इतर विभागातील विविध विकास कांमाच्या करारनाम्यात दोष दायीत्व कालावधी निच्छीत करण्याबाबतची अट लेखी स्वरुपात नमुद करणेबाबतचा विषय चर्चेकरीता सर्वसाधारण सभेसमोर ठेवणेबाबत.

विषय क्र.२२- यवतमाळ नगर परिषदेतील बांधकाम विभागात कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या स्थापत्य अभियंता श्री. निखिल ढबाले यांच्या कंत्राटास मुदतवाढ देण्याबाबत मंजुरीसाठीचा विषय चर्चेकरीता सर्वसाधारण सभेसमोर ठेवणेबाबत.

विषय क्र.२३- नागपुर रोड व पांढरकवडा रोड जोडणारा नगर परिषदेच्या रिंग रोड वरील नाला तसेच आजुबाजूने नाली बांधकाम करणे हे काम आपत्ती व्यवस्थापन निधीतुन करण्यास तसेच या ठिकाणी तात्पुरते टीनाचे शेड(Shopping Complex) उभारण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेबाबत.

विषय क्र.२४- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.२ मधील शालीमार पार्क येथील फिरोज भंगारवाले(आसीफ पान सेटंर)ते बर्फ फॅक्टरी पर्यत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे या कामास नगर परिषद निधी अंतर्गत करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेबाबत.

विषय क्र.२५- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील खालील नमुद कामे सर्वसाधारण रस्ता अनुदान मधुन करणे या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करणेबाबत सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.२६- शुभमंगलम मंगल कार्यालय ते स्वावलंबी शाळा पर्यत च्या मुख्य रस्त्याला राजमाता जिजाऊ मार्ग व राष्ट्रीय मार्गावरील चौकाला राजमाता जिजाऊ चौक यांचे नाव देण्याकरीता सभेच्या माहीतीस्तव व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.२७- नगर परिषद मधील बांधकाम विभाग मार्फत नगर परिषद हद्दीतील विविध प्रभागामध्ये Hume Pipeपुरवठा करणे व बसविणे या कामाकरीता वार्षीक दर मागविणे करिता सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळण्याबाबत.

विषय क्र.२८- नगर परिषद यवतमाळ हद्दीतील खाजगी खुल्या प्लॉटवरील कचरा व झुडपे साफ करुन याबाबतच्या होणा-या खर्च संबधीत मालमत्ता धारकाकडुन वसुल करण्यास मान्यता देण्याबाबत सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.२९- नगर परिषद यवतमाळ येथील नगर परिषद इमारत व परिसरात पान,खैनी,गुटखा,बिडी व अन्य तत्सम पदार्थाच्या वापरास बंदी घालण्याबात व बंदीचे उल्लंघन करणा-यावर दंडात्मक कार्यवाही करण्यासाठी नियम वं दंड निच्चीत करण्याबाबत.

विषय क्र.३०- नगर परिषद यवतमाळ क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घरगुती कच-याचे संकलन व वाहतुक करणे तसेच सार्वजनिक ठिकाणावरील कचरा ट्रॅक्टर मध्ये भरुन त्याची वाहतुक करणे तसेच नगर परिषद हद्दीतील नाल्याची व रस्त्याचा दैनंदीन साफसफाई करणेसाठी कार्यरत कंत्राटदार यांना मंजुर दरानुसार देयके अदा करणेसाठी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करणेसाठी सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.३१- नगर परिषद यवतमाळ पाणी पुरवठा विभाग अंतर्गत शहरातील विविध ठिकाणी असलेल्या विद्यमान हातपंपाजवळ रेनवॉटर हार्वेस्टींग व्यवस्था उभारण्याबाबत.

विषय क्र.३२- नगर परिषद यवातमाळ क्षेत्रातील धोकादायक पध्दतीने विविध वाढलेल्या झाडांच्या फांदया कापणे तसेच वेळोवेळी प्राप्त होणा-या तक्रारीनुसार झाडाची कटाई करणे ही कामे करण्यासाठी अभिकर्ता नेमण्यासाठी सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.३३- नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये धामनगांव रोडवरील मोहा फाटा चौकाला पुण्यश्लोक राष्ट्रमाता अहील्यादेवी होळकर यांचे नाव देण्याकरीता सभेच्या माहीतीस्तव व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.३४- यवतमाळ नगर परिषद विकास आराखडयातील आरक्षण क्रमांक १०१ नझुल शिट क्रमांक ३८ ए,३८ बी भुखंड क्र.०८,९/१(पैकी) मध्ये दुकान संकुल व सांस्कृतीक केंद्र बांधकाम करणे.

विषय क्र.३५- नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये प्रभाग क्र.१७ मधील महाजन लेआऊट येथील महीला व बालकल्याण विभाग अंतर्गत बांधलेल्या सभागृहात अभ्यासीका मंजुर करुन आवश्यक साहीत्य उपलब्ध करुन देण्याबाबत या विषयास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्याकरीता सदर विषय सभेच्या माहीतीस्तव व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.३६- यवतमाळ नगर परिषद मालकीची सर्व्हे क्र.६७ व ६८ मधील जागा केंद्र शासनाच्या रेल्वे विभागास वर्धा नांदेड रेल्वे प्रकल्प बांधकाम करण्यासाठी हस्तांतरीत केलेल्या जागेच्या प्राप्त निधीबाबत सभेच्या माहीतीस्तव.

विषय क्र.३७- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील केंद्रीय विद्यालयाला जोडणा-या पोचमार्ग रस्त्याचे(अप्रोच रोडचे) खडीकरण व डांबरीकरण करणे या कामास जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करणेबाबत सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.३८- नगर परिषद यवतमाळ प्रशासकीय इमारतीच्या तळ मजल्यावर वाहन पार्कींग सुविधा सुधारण्याबाबत च्या विषय सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे.

विषय क्र.३९- नगर परिषद यवतमाळ अंतर्गत सावरगड स्थित घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे आग प्रतिबंधक व अग्निशमन यंत्रणा उभारण्याकरीता प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करणेसाठी सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.४०- दत्त चौक भाजी मार्केट मधिल खाली असलेले हॉल भाडेतत्वावर देणेबाबत सभेच्या माहीतीस्तव व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.४१-यवतमाळ नगर परिषद हद्दीतील बाबाजी दाते कॉलेज ते तीन फोटो चौक रस्त्याचे रुंदीकरण करण्यासाठी जागा अधिग्रहण करणेबाबत.

विषय क्र.४२- नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये प्रभाग क्र.१२ मधील महात्मा फुले यांचे पुतळयाजवळ व राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे पुतळयाजवळ सौदर्यीकरण करणे या विषयास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्याकरीता सदर विषय सभेच्या माहीतीस्तव व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.४३- नगर परिषद मार्फत राबविण्यात येण-या विविध विकास कामे व योजनांची माहीती नागरिकांपर्यत पोहचविण्यासाठी प्रसार –प्रचार करण्याकरीता संस्थेची नियुक्ती करण्याबाबत सभेच्यामाहीतीस व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.४४- नगर परिषद यवतमाळ क्षेत्रातील रस्त्यावरील अतिक्रमण काढल्यानंतर मोकळया झालेल्या जागांवर मोठे झाडे लावण्याकरीता कुडया खरेदी करणेसाठी सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.४५- नगर परिषद यवतमाळ अंतर्गत येणा-या विविध स्थावर मालमत्तांची नोंद ठेवण्यासाठीAsset Management Register तयार करणे तसेच सदर मालमत्तांची सद्यस्थीती पाहण्यासाठी संगणक प्रणाली आधारीत Dashboard विकसीत करण्याबाबत सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.४६- नगर परिषद यवतमाळ हद्दीतील विविध ठिकाणी असलेल्या स्मशानभुमी ची दुरुस्ती व स्थापत्य विषयक कामे करण्याकरीता प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्याबाबत चा विषय सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.४७- सन्मानीय सदस्य यांनी सुचवलेली विकास कांमाना प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्याबाबत चा विषय सभेच्या माहीतीस्तव व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.४८- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अ.जा.वस्ती सधार योजना अंतर्गत सन्मानीय सदस्य यांनी सचविलेली कामे

विषय क्र.४९- नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये १ एप्रील २०२६ पासुन सुरु होणा-या जणगणनेमध्ये ओबीसी सहीत सर्व जातीची जातनिहाय जणगणना करणे या विषयास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्याकरीता सदर विषय सभेच्या माहीतीस्तव व योग्य निर्णयास सादर.

विषय क्र.५०- महाराष्ट्र नागरी सेव(निवृत्तीवेतन) (सुधारणा) नियम,२०२४(वित्त विभाग,दिनांक ८/२/२०२४)तसेच महाराष्ट्र शासन,वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०२४/प्र,क्र.६४/सेवा-४ ,दिनांक७/१/२०२५ अन्वये नगर परिषद यवतमाळ येथील सेवा निवृत्त कर्मचारी/निवृत्तीवेतन धारक यांच्या मृत्युनंतर पात्र वाससांना कुटुंब निवृत्तीवेतन लागु करून लाभ अदा करण्यासाठी सभेच्या माहीतीस व योग्य निर्णयास सविनय सादर.

विषय क्र.५१- वि.अध्यक्ष महोदया यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय.

५१) पोलिस चौकी

५२) [illegible]

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद, यवतमाळ

---

प्रतीलीपी---1. मा.मुख्याधीकारी ,नगर परिषद ,यवतमाळ याना माहितीकरीता अग्रेषीत.
2. विभाग प्रमुख श्री---------------------------------- विभाग --------- -----------

न.प.यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.१ ची प्रत

विषय क्र.१- मागील सभा दि.९/२/२०२६ व स्थगीत सभा १२/२/२०२६ रोजीचे ठराव वाचुन कायम करणे.

सुचक – श्री.नित्यानंद अशोक गिरी

अनुमोदक – श्री.ॲड.आनंद बळीराम गायकवाड

ठराव क्र.१ - नगर परिषद सर्वसाधारण सभा दि.९/२/२०२६ व स्थगीत सभा १२/२/२०२६ रोजीचे ठराव सभेपुढे सभा विभागाचे वतीने सभा अधिक्षक यांनी वाचन केले.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चेमध्ये विरोधी पक्षनेत्या सौ.वैशाली प्रविण सवाई यांनी मागील सभेचे काही विषयाबाबत लेखी माहीती मागीतली त्यानुसार मुख्याधिकारी यांनी विरोधी पक्षनेत्या यांनी उपस्थीत केलेल्या विषयाचे अनुषंगाने माहीती लेखीस्वरुपात देण्याबाबत विभाग प्रमुखाना सुचना केल्यानंतर मा.अध्यक्ष महोदया यांचे आदेशानुसार दि.२३/४/२०२६ रोजीचे विषय पत्रिकेवरील विषयास सुरुवात करण्यात आली. सरतेशेवटी मागील सभेचे ठराव वाचन करण्यात आले. यावेळी कोणत्याही ठरावावर दुरुस्ती अथवा आक्षेप न आल्यामुळे दि.९/२/२०२६ व स्थगीत सभा १२/२/२०२६ रोजीचे ठराव कायम करण्यात येत आहे .

यापुढील नियमानुसार कार्यवाही कायम करण्यात आलेल्या ठरावाचे अनुषंगाने संबधीत विभाग यांनी मा.मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

" करीता ठराव मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/८/२०२६ ठराव क्र.२ ची प्रत

विषय क्र. २- नगर परिषद यवतमाळ हद्दीत आदिवासी समाज भवन बांधण्याकरिता प्राप्त निधीतून महसूल विभागाची जागा भूसंपादन करण्याबाबतचा विषय सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे .

सुचक – श्री.सुभाष दयाराम राय
अनुमोदक – श्री.बिपीन अनिल चौधरी

ठराव क्र. २- नगर परिषद यवतमाळ हद्दीत आदिवासी समाजाकरिता समाज भवन बांधकामासाठी शासनाकडून निधी प्राप्त होणार आहे. सदर बांधकामासाठी योग्य जागा उपलब्ध नसल्यामुळे महसूल विभागाच्या ताब्यातील जागा भूसंपादनाद्वारे प्राप्त करणे आवश्यक आहे.सदर जागा भौगोलिकदृष्ट्या योग्य असून सार्वजनिक उपयोगासाठी उपयुक्त आहे. तसेच समाज भवन उभारणीमुळे आदिवासी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना चालना मिळणार आहे. त्यामुळे महसूल विभागाच्या ताब्यातील संबंधित जागा भूसंपादन करण्यास मान्यता देणे व त्यासाठी आवश्यक प्रशासकीय व आर्थिक कार्यवाही करण्यास मंजुरी देणे आवश्यक आहे.सदर विषय माननीय सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व निर्णयार्थ सादर करण्यात येत असल्याची माहीती नगर अभियंता यांनी सभागृहात दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार नगर परिषद यवतमाळ हद्दीत आदिवासी समाजाकरिता समाज भवन बांधकामासाठी शासनाकडून निधी प्राप्त होणार आहे. मा.जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार महसूल विभागाच्या ताब्यातील मौजा यवतमाळ येथील गट क्रमांक ३४ मधील "ई" वर्ग सरकारी १.९६ हे आर प्रकल्प अधिकारी ए.आर.व्ही.प्रकल्प पाढंरकवडा यांना एकलव्य रेसीडेनशिअल पव्लीक स्कुल चे उभारणीसाठी हस्तांतरीत जमीनी नगर परिषद यवतमाळ यांना सांस्कृतीक भवन बांधण्याकरीता वाटपास उपलब्ध असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात आले असुन सदरील जागा भूसंपादन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही नियोजन विभाग यांनी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

**दिनांक २३/०४/२०२६ रोजीच्या नगर परिषद सर्वसाधारण सभेत पारीत झालेला ठराव क्र. ०३ ची प्रत**

**विषय क्र.०३ :—** नगर परिषद यवतमाळ येथील सर्व नगर परिषद शाळेच्या परिसरात जून/जुलै २०२६ पूर्वी वृक्ष लागवड/परसबाग तयार करणेबाबत विचार विनिमय करणे.

सुचक :— सौ.प्रियंका चेतन भवरे
अनुमोदक :— सौ.रिता गजानन धावतोडे

**ठराव क्र. ३ :—** विषयांकित बाबततचा अहवाल सर्वसाधारण समितीसमोर ठेवला असता त्यावर सभेत सविस्तर चर्चा झाली. यवतमाळ नगर परिषद व्दारा संचालीत नगर परिषदेच्या एकूण १५ शाळा सुरू आहेत. मराठी माध्यमाच्या ११, उर्दू माध्यमाच्या ०३ व हिंदी माध्यमाची ०१ शाळा असे एकुण १५ शाळा सुरू आहेत. सर्व शाळा वर्ग १ ते ८ वी च्या आहेत. प्रत्येक शाळेत मैदान व शाळेच्या परिसरात खुली जागा आहे. शासन निर्णय/परिपत्रकानुसार शालेय सौंदर्यीकरण व उत्तम वातावरणाकरीता प्रत्येक शाळेत एक परसबाग असणे आवश्यक आहे. त्यामुळे नगर परिषदेच्या शाळेतील मुख्याध्यापकांशी चर्चा करून नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र. १, ४, ५, ७, १०, ११,१२, १३, १४, १८,२० तसेच कन्या शाळा क्र. ६, ८, ९, १४ यवतमाळ येथील शाळेत जून/जुलै २०२६ पूर्वी वृक्ष लागवड/परसबाग तयार करण्याबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

या अनुषंगाने नियोजन विभाग, नगर परिषद यवतमाळ यांनी नियमानुसार निविदा प्रकीया राबवून पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. करीता येणा—या खर्चास ही समिती सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करीत आहे. पुढील कार्यवाही मा.मुख्याधिकारी, नगर परिषद यवतमाळ यांचे सुचनेनुसार करावी.

करीता ठराव सर्वानुते मंजूर

(ॲड.प्रियदर्शनी अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद,यवतमाळ

**दिनांक २३/०४/२०२६ रोजीच्या नगर परिषद सर्वसाधारण सभेत पारीत झालेला ठराव क्र. ०४ ची प्रत**

**विषय क्र.०४ :—** नगर परिषद शाळेत इंग्रजी माध्यम पहिला वर्ग ते दहावी पर्यंत सुरू करणेबाबत विचार विनिमय करणे.

सुचक :— सौ.प्रियंका चेतन भवरे
अनुमोदक :— सौ.साधना विनोद काळे

**ठराव क्र. ४ :—** विषयांकित बाबतचा अहवाल समितीसमोर ठेवला असता त्यावर सभेत सविस्तर चर्चा झाली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या तसेच काळाच्या दृष्टीने यवतमाळ नगर परिषद यवतमाळ व्दारा एक इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करण्यात यावी या अनुषंगाने सभेत सर्व सन्मानिय सदस्यांनी सविस्तर चर्चा करून इंग्रजी माध्यमाचा पहिला वर्ग पीएमश्री मॉ जिजाऊ नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र. २० यवतमाळ सेथे सुरू करण्याबाबत निर्णय घेतलेला आहे.

आधुनिक काळात यवतमाळ नगर परिषदेच्या शाळेतील विदयार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने तसेच शालेय विदयार्थ्यामध्ये शिक्षणाची आवड व अभ्यासाची आवड निर्माण होण्यासाठी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करणे आवश्यक आहे असे मत सदस्यांनी व्यक्त करून नगर परिषद माध्यमिक विदयालय, यवतमाळ येथे वर्गखोल्या शिल्लक असल्याने सदरील शाळेत शैक्षणिक सत्र २०२६—२७ पासून इंग्रजी माध्यम पहिला वर्ग सुरू करणेबाबत सर्वानुमते ठरविले. या अनुषंगाने वरीष्ठ कार्यालयाची परवानगी घेवून नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

इंग्रजी माध्यम पहिला वर्ग सुरू करण्यासाठी तसेच दरवर्षी नैसर्गिकरित्या वाढ होणा—या प्रत्येक वर्गाकरीता कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती करावी लागेल. याकरीता ही सभा कायमस्वरूपी धोरणात्मक निर्णय घेत आहे. पुढील कार्यवाही मुख्याधिकारी, नगर परिषद यवतमाळ यांचे सुचनेनुसार प्रशासन अधिकारी, नगर परिषद शिक्षण विभाग, यवतमाळ यांनी करावी. याकरीता येणा—या खर्चास ही सभा वित्तीय व प्रशासकिय मंजूरी प्रदान करीत आहे.

करीता ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

(अॅड.प्रियदर्शनी अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद,यवतमाळ

**दिनांक २३/०४/२०२६ रोजीच्या नगर परिषद सर्वसाधारण सभेत पारीत झालेला ठराव क्र. ०५ ची प्रत**

**विषय क्र.०५ :—** नगर परिषद शाळेत के.जी. १ के.जी.२ सुरू करणेबाबत विचार विनिमय करणे.

सुचक :— सौ.प्रियंका चेतन भवरे
अनुमोदक :— सौ.साधना विनोद काळे

**ठराव क्र.०५ :—** विषयांकित बाबतचा अहवाल समितीसमोर ठेवला असता त्यावर सभेत सविस्तर चर्चा झाली. यवतमाळ नगर परिषद व्दारा संचालीत नगर परिषदेच्या एकूण १५ शाळा सुरू आहेत. नगर परिषदेच्या शाळेतील पटसंख्या वाढविण्याच्या दृष्टीने नगर परिषदेच्या खालील शाळांमध्ये के.जी. १ के.जी. २ सुरू करणेबाबत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

१. नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र. १ यवतमाळ
२. नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा क्र. २० यवतमाळ
३. नगर परिषद उच्च प्राथमिक कन्या शाळा क्र. ६ यवतमाळ
४. नगर परिषद उच्च प्राथमिक उर्दू कन्या शाळा क्र. १४ यवतमाळ
५. नगर परिषद उच्च प्राथमिक हिंदी शाळा क्र. ११ यवतमाळ

नगर परिषद शाळांमध्ये के.जी. १ के.जी. २ सुरू करणेसाठी कंत्राटी शिक्षकांची नियुक्ती करावी लागेल. या अनुषंगाने पुढील कार्यवाही मुख्याधिकारी, नगर परिषद यवतमाळ यांचे सुचनेनुसार प्रशासन अधिकारी, नगर परिषद शिक्षण विभाग, यवतमाळ यांनी करावी. याकरीता याकरीता येणा—या खर्चास ही सभा वित्तीय व प्रशासकिय मंजूरी प्रदान करीत आहे.

करीता ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

(ॲड.प्रियदर्शनी अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद,यवतमाळ

दिनांक २३/०४/२०२६ रोजीच्या नगर परिषद सर्वसाधारण सभेत पारीत झालेला ठराव क्र. ०६ ची प्रत

**विषय क्र.०६ :—** यवतमाळ नगर परिषदेच्या सर्व शाळेमध्ये सेमी इंग्रजी वर्ग सुरू करणेबाबत विचार विनिमय करणे.

सुचक :— सौ.प्रियंका चेतन भवरे
अनुमोदक :— सौ.निता भास्कर केळापुरे

**ठराव क्र.०६ :—** विषयांकित बाबतचा अहवाल समितीसमोर ठेवला असता त्यावर सभेत सविस्तर चर्चा झाली. यवतमाळ नगर परिषद व्दारा संचालीत नगर परिषदेच्या एकूण १५ शाळा सुरू आहेत. तंत्रज्ञानाच्या दृष्टीने मराठीसोबतच इंग्रजी भाषचे ज्ञान शालेय विदयार्थ्यांना अवगत असणे आवश्यक आहे. शिवाय पालकांचा कल सुध्दा इंग्रजी भाषेकडे जास्त प्रमाणात दिसून येतो. त्यामुळे नगर परिषदेच्या शाळेतील पटसंख्या वाढविण्याच्या दृष्टीने तसेच गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने खालील नगर परिषद शाळेत सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

१. नगर परिषद उच्च प्राथमिक कन्या शाळा क्र. ६ यवतमाळ
२. नगर परिषद उच्च प्राथमिक कन्या शाळा क्र. ८ यवतमाळ
३. नगर परिषद उच्च प्राथमिक उर्दू कन्या शाळा क्र. १४ यवतमाळ
४. नगर परिषद उच्च प्राथमिक हिंदी शाळा क्र. ११ यवतमाळ

तरी पुढील कार्यवाही मुख्याधिकारी, नगर परिषद यवतमाळ यांचे सुचनेनुसार प्रशासन अधिकारी, नगर परिषद शिक्षण विभाग, यवतमाळ यांनी करावी. याकरीता येणा—या खर्चास ही सभा वित्तीय व प्रशासकिय मंजूरी प्रदान करीत आहे.

करीता ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

(अॅड.प्रियदर्शनी अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद,यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.७ ची प्रत

विषय क्र.७ - नगर परिषद यवतमाळच्या बांधकाम विभागातील सेवानिवृत्त लिपीक यांना मनुष्यबळ पुरवठा कंत्राटांतर्गत किमान वेतनावर नेमणूक करून बांधकाम विभागाशी संबंधित कामकाजासाठी नियुक्त करण्याबाबत – विषय चर्चेकरीता सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्याबाबत.

सुचक – सौ.निता भास्कर केळापुरे
अनुमोदक – ॲड.आनंद बळीराम गायाकवाड

ठराव क्र.७ :- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५मधील तरतुदीनुसार नगर परिषदेस आवश्यकतेनुसार मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याचा अधिकार आहे. तसेच विविध विभागांतील कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक तांत्रिक व प्रशासकीय मनुष्यबळाची उपलब्धता असणे आवश्यक आहे.शासन निर्णय क्रमांक : सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३) दिनांक १० जून २०२५ मधील अनुच्छेद क्रमांक ९ (४) नुसार गट 'क' व गट 'ड' संवर्गातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना मानधन तत्वावर पुन्हा नियुक्ती देण्यास परवानगी नाही. सदर तरतूद केवळ गट 'अ' (Class I) व गट 'ब' (Class II) अधिकाऱ्यांसाठी लागू आहे. त्यामुळे गट 'क' संवर्गातीलसेवानिवृत्त लिपीक यांना थेट मानधन तत्वावर नियुक्त करणे नियमबाह्य ठरते.नगर परिषद यवतमाळच्या बांधकाम विभागातील सेवानिवृत्त लिपीक यांचा अनुभव लक्षात घेता त्यांची सेवा बांधकाम विभागातील दैनंदिन कामकाजासाठी उपयोगात आणण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत नगर परिषदेमध्ये मनुष्यबळ पुरवठा कंत्राट कार्यान्वित असून त्या अंतर्गत विविध प्रकारचे मनुष्यबळ किमान वेतन तत्वावर उपलब्ध करून घेतले जात आहे.शासन नियमांनुसार संबंधित सेवानिवृत्त लिपीक यांना मानधन तत्वावर थेट नियुक्ती देणे शक्य नाही. तथापि, नगर परिषदेमध्ये चालू असलेल्या मनुष्यबळ पुरवठा कंत्राटाच्या माध्यमातून किमान वेतनावर त्यांची नियुक्ती करण्याचा पर्याय उपलब्ध आहे. अशा प्रकारे नियुक्त केल्यास संबंधित व्यक्तीकडून बांधकाम विभागाशी निगडीत दैनंदिन कामकाज (कार्यालयीन सहाय्य, अभिलेख व्यवस्थापन, पत्रव्यवहार इ.) करून घेणे शक्य होईल. सदर नियुक्ती मनुष्यबळ पुरवठा कंत्राटांतर्गत किमान वेतनावर करण्यात येणार असल्याने त्यासाठीचा खर्च मंजूर कंत्राटाच्या अटी व तरतुदीनुसार भागविण्यात येईल.सेवानिवृत्त गट 'क' कर्मचाऱ्यांना थेट मानधन तत्वावर नियुक्ती देणे शासन निर्णयानुसार ग्राह्य नाही, मात्र मनुष्यबळ पुरवठा कंत्राटांतर्गत किमान वेतनावर नियुक्ती करण्याचा पर्याय उपलब्ध आहे, संबंधित व्यक्तीकडून बांधकाम विभागाशी संबंधित कामकाज करून घेण्याबाबत विचार करता येईल, म्हणून सदर विषयावर सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा करून योग्य निर्णयास सादर करण्यात आल्याची कार्यालयीन टिप्पणी नुसार माहीती देण्यात येत आहे.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार नगर परिषदेमध्ये चालू असलेल्या मनुष्यबळ पुरवठा कंत्राटाच्या माध्यमातून किमान वेतनावर त्यांची नियुक्ती करण्याचा पर्याय उपलब्ध असल्यामुळे अशा प्रकारे नियुक्त करुन संबंधित व्यक्तीकडून बांधकाम विभागाशी निगडीत दैनंदिन कामकाज (कार्यालयीन सहाय्य, अभिलेख व्यवस्थापन, पत्रव्यवहार इ.) करून घेण्यात यावे. सदर नियुक्ती मनुष्यबळ पुरवठा कंत्राटांतर्गत किमान वेतनावर करण्यात यावी त्यासाठीचा खर्च मंजूर कंत्राटाच्या अटी व तरतुदीनुसार करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.यापुढील नियमानुसार कार्यवाही आस्थापना विभागानी मुख्याधिकारी यांचे आदेशानी करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

स्थायी समीती सभा दिनांक २३/०४/२०२६ ठराव क्र.ची ८ प्रत

विषय क्र. ८ :- आगामी पावसाळ्याच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून नगर परिषद यवतमाळ हद्दीतील मुख्य व मोठ्या नाल्यांची यंत्रसामग्रीद्वारे साफसफाई करण्याबाबत.

सुचक- सौ.लता रमेश ठोंबरे

अनुमोदक- सौ.चैताली निलेश बेलोकार

ठराव क्र. ८ :- नगर परिषद यवतमाळ शहराचा भौगोलिक विस्तार आणि पावसाळ्यातील संभाव्य अतिवृष्टी विचारात घेता, शहरातील मुख्य नाल्यांची स्वच्छता करणे ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. नाल्यांमध्ये साचलेला गाळ, कचरा आणि वाढलेली झाडे-झुडपे यामुळे पाण्याचा प्रवाह अडकून शहरात पूरसदृश स्थिती निर्माण होऊ शकते. ही आपत्कालीन परिस्थिती टाळण्यासाठी पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील सर्व मोठ्या नाल्यांची यंत्रसामग्रोद्वारे (JCB/Poclain) खोलवर साफसफाई करणे आवश्यक आहे, या प्रस्तावावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सर्वानुमते आरोग्य विभागचे वतीने सादर करण्यात आलेल्या पुरक टीप्पणी नुसार सदर कामाचे निविदा प्रक्रीयासह होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात आली. यापुढील कार्यवाही आरोग्य विभाग यांनी मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

(अ‍ॅड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद, यवतमाळ

स्थायी समीती सभा दिनांक २३/०४/२०२६ ठराव क्र.ची ९ प्रत

विषय क्र. ९ :- नगर परिषद यवतमाळ हद्दीतील सार्वजनिक मोठ्या विसर्जन विहिरींमधील गाळ उपसून पूर्ण साफसफाई करण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

सुचक-सौ.कीर्ती संतोष राऊत

अनुमोदक-सौ.अमृता ओमप्रकाश तिवारी

ठराव क्र. ९ :-"नगर परिषद यवतमाळ शहरामध्ये विविध ठिकाणी असलेल्या मोठ्या विसर्जन विहिरींमध्ये मागील काही काळात विसर्जित केलेले साहित्य, वाहून आलेली माती आणि कचरा यामुळे मोठ्या प्रमाणावर गाळ साचलेला आहे. या गाळामुळे विहिरींमधील पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत (झरे) बंद झाले असून, पाण्याचे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. आगामी सण-उत्सव आणि पावसाळा पाहता, या विहिरींमधील गाळ उपसून त्यांचे खोलीकरण व स्वच्छता करणे जलपुनर्भरण (Groundwater Recharge) आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अनिवार्य आहे.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सर्वानुमते पाणी पुरवठा विभागाचे वतीने सादर करण्यात आलेल्या पुरक टीप्पणी नुसार सदर कामाचे निविदा प्रक्रीयासह होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात आली. यापुढील कार्यवाही पाणी पुरवठा विभाग यांनी मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

(अ‍ॅड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद, यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.१० ची प्रत

विषय क्र.१०- नगर परिषद यवतमाळ बांधकाम विभागमार्फत तांत्रिक सल्लागार नेमण्यास मान्यता देण्याबाबत चा विषय चर्चेकरीता सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्याबाबत.

सुचक – सौ.अमृता ओमप्रकाश तिवारी
अनुमोदक – श्री.लोकेश वसंतराव इंगोले

ठराव १० :- नगर परिषद मधील बांधकाम विभाग मार्फत विविध शासकीय योजानांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.सदर योजनांच्या अमलबजावनी दरम्यान तांत्रिक बाबीची पूर्तता,आराखडे तयार करणे,अंदाजपत्रके तयार करणे तसेच कांमाची गुणवत्ता राखणे या दृष्ट्रीने तांत्रिक मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.

सद्यस्थीतीत नगर परिषदेकडे उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ अपुरे/मर्यादीत असल्यामुळे कामे वेळेत व योग्य दर्जात पूर्ण करण्यास अडचणी येत आहे त्यामुळे विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी बांधकाम विभाग मार्फत तांत्रिक सल्लागार नेमणे आवश्यक आहे. तांत्रिक सल्लागार नेमल्यास कामांची गुणवत्ता सुधारेल,नियोजन सुसुत्र होईल व योजनाची अंमलबजावणी अधिक कार्यक्षमतेने होईल.

म्हणून नगर परिषद बांधकाम विभाग मार्फत तांत्रिक सल्लागार नेमणे याकरीता निविदा प्रसिध्द करण्यास व निविदा प्रक्रीयेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे बाबतचा विषय सर्वसाधारण सभेस मान्यता करीता सादर करण्यात आल्याची कार्यालयीन टिप्पणी नुसार माहीती

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व पारदर्शकता राखण्यासाठी ई-निविदा (e-tendering) प्रक्रिया राबविण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही स्वच्छतास विभागानी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.११ ची प्रत

विषय क्र.११- नगर परिषद यवतमाळ बांधकाम विभागामार्फत तांत्रिक सल्लागार नेमण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून मानधन तत्वावर नेमणूक करण्यास मान्यता देण्याबाबत विषय चर्चेकरीता सर्वसाधारण सभेसमोर ठेवणेबाबत.

सुचक – सौ.निता भास्कर केळापुरे
अनुमोदक – श्री.देविदास नामदेवराव अराठे

ठराव ११ :- महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार नगर परिषदेमार्फत विविध विकासकामे व अभियांत्रिकी प्रकल्पांचीअंमलबजावणी करण्यात येते. सदर कामकाज तांत्रिकदृष्ट्या सक्षम, गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे. तथापि, नगर परिषद यवतमाळच्या बांधकाम विभागामध्ये उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ मर्यादित असल्यामुळे कामकाजावर ताण येत असून विविध प्रकल्पांच्या अंमलबजावणीत अडचणी निर्माण होत आहेत.महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व पारदर्शकता राखण्यासाठी आवश्यक सेवा/सल्लागार नेमणूक करताना ई-निविदा (e-tendering) प्रक्रिया अवलंबणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यानुसार बांधकाम विभागासाठी तांत्रिक सल्लागार नेमणूक ही स्पर्धात्मक व पारदर्शक पद्धतीने करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. सदर तांत्रिक सल्लागाराच्या माध्यमातून विविध कामांचे अंदाजपत्रक परीक्षण, तांत्रिक मान्यता, देखरेख, गुणवत्ता नियंत्रण, मोजमाप पडताळणी तसेच अभियंता स्तरावरील तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नगर परिषदेमार्फत हाती घेण्यात येणारी कामे नियमानुसार व वेळेत पूर्ण करण्यास मदत होईल.तांत्रिक सल्लागाराची नेमणूक ई-निविदा प्रक्रियेद्वारे निवड झालेल्या पात्र निविदाधारकाकडून मानधन तत्वावर करण्यात येणार असून त्यासाठी लागणाऱ्या अटी व शर्ती,कार्यक्षेत्र व मानधन निश्चित करण्याबाबत स्वतंत्र कार्यवाही करावी लागेल. सदर बाबीसाठी लागणारा खर्च नगर परिषद निधीतून भागविण्यात येणार असल्याने त्यासाठी आवश्यक वित्तीय व प्रशासकीय मंजुरी देणे आवश्यक आहे.वरीलप्रमाणे, बांधकाम विभागाच्या कामकाजाच्या दृष्टीने तांत्रिक सल्लागार नेमण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून मानधन तत्वावर नेमणूक करण्यास मान्यता करिता सदर विषयावर सर्वसाधारण सभेमध्ये चर्चा करून योग्य निर्णयास सादर करण्यात आल्याची कार्यालयीन टिप्पणी नुसार माहीती देण्यात येत आहे.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व पारदर्शकता राखण्यासाठी सल्लागार नेमणूक करताना ई-निविदा (e-tendering) प्रक्रिया राबविण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही आस्थापना विभागानी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

**नगर परिषद यवतमाळ सर्वसाधारण सभा दिनाक २३/०४/२०२६ चे सभेतील**

**ठराव क्र. १२ ची प्रत**

विषय क्र. १२ :- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील स. क्र. ५१ मौजा यवतमाळ येथील जागा भूसंपादन करण्याबाबत......

**सूचक** - ॲड. श्री. आनंद गायकवाड
**अनुमोदक** – सौ. सविता चव्हाण

ठराव :- मा. सदस्य नगर परिषद यवतमाळ १) ॲड आनंद गायकवाड २) सौ. सविता चव्हाण ३) श्री. इंजि. विपुल खोब्रागडे ४) श्रीमती साधना शंभरकर यांनी नगर परिषद यवतमाळ हद्दीतील स. क्र. ५१ पै. जागा भूसंपादन करण्यासाठी मागणी केली आहे. त्यानुषंगाने सदरचा विषय सभेसमोर मांडण्यात येत आहे.

यवतमाळ शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-३१ खाली शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसूचना क्र. टीपीएस/ २७९५/१६००/सीआर-२५२/नवि-१३ दि: ०८/०७/१९९८ अन्वये मंजूर करण्यात अली आहे. तसेच या कार्यालयाचे पत्र क्र. १४२६/२०२५ दि: २८/०३/२०२५ अन्वये प्रारूप विकास योजना यवतमाळ (दु.सु.+वा.ह) शासनास मंजुरीस्तव सादर करण्यात आली आहे. उक्त विकास योजनेत स. क्र. ५१ भागशः क्षेत्र रहिवास वापर विभागात, भागशः क्षेत्र सार्वजनिक निम-सार्वजनिक वापर विभागात समाविष्ट आहे व तसेच सदरील स. क्र. मध्ये १८.०० मी रुंद विकास योजनेचा रस्ता प्रस्तावित आहे.

सदरील स.क्र मध्ये भागशः क्षेत्र करिता मुख्याधिकारी नगर परिषद यवतमाळ यांनी दिनांक २८/०७/१९८८ रोजीच्या अधिसुचद्वारे झोपडपट्टी घोषित केली होती, तसेच २४/०३/२०१८ रोजीच्या अधिसूचना द्वारे पुनश्च ७.१२ हे. आर. करिता झोपडपट्टी म्हणून घोषित केल्याचे दिसून येते. सदरची अधिसूचना विरुद्ध देवेंद्रकुमार गणपतलाल चमेडीया व इतर ५ यांनी महाराष्ट्र ट्रिब्युनल गृहनिर्माण मुंबई येथील अपील क्र. ०६/२०१८ दाखल केली असून सदरचा विषय ट्रिब्युनल कडे सुरु आहे. त्यामध्ये नगर परिषद यवतमाळ च्या वतीने अभियोक्ता यांनी दिनांक ०६/०२/२०२६ रोजी ट्रिब्युनल कडे उत्तर दाखल केला आहे. तसेच सदरील जागेच्या सदर्भात मा. उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर येथील WP/६६०५/२०१४ दाखल असून त्यामध्ये शेवटची सुनावणी दिनांक २१/०४/२०२२ रोजीची झाली असून प्रकरणात अंतिम निकाल लागल्याचे दिसून येत नाही.

तेव्हा सदरील जमीनी बाबत प्रकरण ट्रिब्युनल व मा. उच्च न्यायालय येथील न्यायप्रविष्ट असल्याने भूसंपादनाची कार्यवाही करणे नियमोचीत होईल किंवा कसे? याबाबत विधी सल्ला घेऊन विधी तज्ञांचे सल्लानुसार तसेच मा. उच्च न्यायालय यांचे व मा. ट्रिब्युनल यांचे निर्णयाचे अधीन राहून भूसंपादनाची कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे व पुढील नियमानुसार कार्यवाही कायदेशीर बाबी तपासून नगर रचना विभाग यांनी मा. मुख्याधिकारी नगर परिषद यवतमाळ यांच्या आदेशानुसार करावी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

( ॲड.प्रियदर्शनी अशोक उईके )
नगराध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

# नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा

दिनांक-23/04/2026

**ठराव क्र- 13**

**विषय क्र-13 :** नगर परिषद यवतमाळ येथील विविध विभागात मागील वर्षात थकित असलेल्या देयकाची अदायगी करणेबाबत सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर.

**सुचक** - श्री. नित्यानंद अशोक गिरी

**अनुमोदक**- सौ. अमृता ओमप्रकाश तिवारी

**ठराव क्र** 13 - नगर परिषद यवतमाळ अंतर्गत विविध विभागांमार्फत मागील आर्थिक वर्षात विविध कामे, सेवा व पुरवठा यासाठी कंत्राटदार/पुरवठादार यांच्याकडून कामे करून घेण्यात आलेली आहेत. सदर कामांपैकी काही देयके प्रशासकीय, तांत्रिक अथवा इतर कारणास्तव अद्याप प्रलंबित (थकित) आहेत.

थकित देयकांच्या अदायगीस विलंब झाल्यामुळे संबंधित कंत्राटदार/पुरवठादार यांचेकडून वारंवार मागणी करण्यात येत आहे, यामुळे प्रशासनावर आर्थिक व कायदेशीर दायित्व निर्माण होण्याची शक्यता आहे. तरी, नगर परिषद यवतमाळ येथील विविध विभागातील मागील काही वर्षातील थकित देयकांची अदायगी करणेसाठी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देणेकरिता सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर.

वरीलप्रमाणे विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीचे सभेत वाचन करण्यात आले. त्यानंतर कोणत्या कंत्राटदाराचे देयके थकित आहेत याबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यानुसार पाणीपुरवठा विभागातील तत्कालीन कंत्राटदार अभिलाष खंडारे यांचे सन 2023-24 ते 2025-26 या कालावधी मधील पुर्ण झालेल्या कामाचे देयके थकित असल्याचे कळविण्यात आले. तसेच घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित कामे केलेल्या एस.सी. सुराणा व तिवारी एंटरप्राइजेस (जे.वी) आणि जनआधार सेवाभावी संस्था लातूर यांचे नोंव्हेबर-2020 ते फेब्रुवारी-2021 या कालावधीतील देयके बाकी असल्याचे प्राथमिकरित्या कळविले. तसेच नगर परिषद यवतमाळ येथील इतर विभागातील मागील आर्थिक वर्षामधील काही देयके प्रलंबित असल्याचे मा. सर्वसाधारण सभेत सांगण्यात आले होते.

त्यानुसार यावर सभेत विस्तृत चर्चा करण्यात आली. त्यानंतर नगर परिषद यवतमाळ कडे थकित असलेल्या सर्व देयकाची नियमानुसार तपासणी करून थकित देयके संबंधित योजनेतून किंवा नगर परिषद निधीमधील काम असल्यास नगर परिषद निधीमधून अदा करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. पुढील कार्यवाहीचे आधिकार मुख्याधिकारी नगर परिषद यवतमाळ यांना सोपविण्यात येत आहेत.

**"करिता ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे."**

(ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

# सर्व साधारण सभा दि.२३/०३/२०२६ ठराव क्र.१४ ची सत्यप्रत

विषय क्र.१४:- नगर परिषद यवतमाळ हद्दीतील प्रभागामध्ये ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेमधून स्ट्रीट लाईट बसविण्याच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

सूचक :- श्री. विपीन अनिल चौधरी

अनुमोदक :- श्री. नित्यानंद अशोक गिरी.

ठराव क्र १४:- सदर विषयाची नस्ती सभेमध्ये पाहण्यात आली व त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली विद्युत नगर अभियंता यांनी दिलेल्या माहितीनुसार महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या "ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना" शासन निर्णयान्वये आदिवासी वस्त्या / राखीव प्रभागांमध्ये मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देणे, पायाभूत सुविधा विकसित करणे व नागरिकांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने विविध विकासकामे हाती घेण्याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने नगर परिषद यवतमाळ अंतर्गत आदिवासी राखीव प्रभाग क्रमांक ०३,०५,१८ आणि २९ मधील नागरिकांना सुरक्षित व सुस्थित सार्वजनिक प्रकाश व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी तसेच आवश्यक विद्युत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने ठक्कर बाप्पा योजनेअंतर्गत विविध विद्युत विषयक विकासकामे प्रस्तावित करणे आवश्यक असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आले.

सदर कामांमध्ये नवीन एलईडी स्ट्रीट लाईट बसविणे, जुने व नादुरुस्त विद्युत पोल व साहित्य बदलणे, नवीन विद्युत पोल उभारणे, आवश्यक ठिकाणी भूमिगत / ओव्हरहेड केबल टाकणे, सार्वजनिक चौक, समाजमंदिर, मैदाने व इतर सार्वजनिक ठिकाणी हायमास्ट / फ्लड लाईट व्यवस्था करणे, विद्युत पॅनेल व संरक्षण यंत्रणा बसविणे, तसेच आवश्यक त्या ठिकाणी विद्युत दुरुस्ती व नूतनीकरणाची कामे करणे इत्यादी बाबींचा समावेश राहील.

सदर कामे पूर्ण झाल्यानंतर संबंधित आदिवासी राखीव प्रभागांमध्ये सार्वजनिक सुरक्षिततेमध्ये वाढ होऊन नागरिकांना मूलभूत नागरी सुविधा अधिक सक्षमपणे उपलब्ध होतील. तसेच ऊर्जा बचतीस प्रोत्साहन मिळून आधुनिक व कार्यक्षम प्रकाश व्यवस्था निर्माण होण्यास मदत होईल.

त्यामुळे नगर परिषद यवतमाळ अंतर्गत आदिवासी राखीव प्रभाग क्रमांक ०३,०५,१८ आणि २९ मध्ये "ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना" अंतर्गत खालील विद्युत विषयक विकासकामे सभेमध्ये प्रस्तावित करण्यात आली.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १ | प्रभाग क्र. १८ मधील आदिवासी सोसायटी सभागृहाचे विद्युतीकरण करणे व १२.५ मीटर उंचीचा हायमास्ट लावणे. |
| २ | प्रभाग क्र. १८ आदिवासी सोसायटी मधील कालीमाता मंदिर समोर सोलर हायमास्ट लावणे. |
| ३ | प्रभाग क्र. १८ मधील श्रीमती मंगलाताई माळवे यांचे घरासमोर सोलर हायमास्ट लावणे |
| ४ | प्रभाग क्र. १८ मधील श्री. सतीश आत्राम ते मडावी यांच्या घरासमोरील रस्त्यावर पथदिवे लावणे. |
| ५ | प्रभाग क्र. १८ आदिवासी सोसायटी मधील श्री. पोयाम यांचे घराजवळ (लहान हनुमान मंदिर ) येथे सोलर हायमास्ट लावणे. |
| ६ | प्रभाग क्र. १८ नवजीवन सोसायटी मधील श्री. येरमेकर ते परचाके यांच्या घरासमोरील रस्त्यावर पथदिवे लावणे. |
| ७ | प्रभाग क्र. १८ मधील श्री.नैताम यांच्या घरासमोरील रस्त्यावर पथदिवे लावणे. व प्रभाग क्र. १८ श्री. कोडापे ते श्री. उईके ते श्री. आत्राम यांच्या घरासमोरील रसत्यावर पथदिवे लावणे |
| ८ | प्रभाग क्र. १८ मधील श्री. पंधरे ते श्री. मसराम यांच्या घरासमोरील रसत्यावर पथदिवे लावणे. |

| | |
|---|---|
| ९ | प्रभाग क्र. १८ मधील श्री.कोडापे ते श्री.नैताम यांच्या घरासमोरील रस्त्यावर पथदिवे लावणे. |
| १० | प्रभाग क्र. १८ मधील गुरुनानक नगर मध्ये श्री. गेडाम ते श्री. करपते यांच्या घरासमोरील रस्त्यावर पथदिवे लावणे. |
| ११ | प्रभाग क्र. १८ मधील बोरले नगर येथील श्री. गेडाम यांच्या घरासमोर १२.५ मीटर उंचीचा हायमास्ट लावणे. |
| १२ | प्रभाग क्र.१८ मधील गुरुवंदन सोसायटी मधील श्री. मडावी यांच्या घरसमोरील रस्त्यावर पथदिवे लावणे. |
| १३ | प्रभाग क्र. १८ मधील नवजीवन सोसायटी मधील श्री. चौधरी ते श्री. थरकडे यांच्या घरासमोरील रसत्यावर पथदिवे लावणे. |
| १४ | प्रभाग क्र.५ मधील धनश्री नगर मध्ये श्री. मडावी ते श्री. नागोसे यांच्या घरापर्यंत विद्युत पोल लावणे. |
| १५ | प्रभाग क्र.५ मधील धनश्री नगर श्री. ऊईके ते नागोसे यांच्या घरामागील रस्त्यालगत विद्युत पोल लावणे. |
| १६ | प्रभाग क्र.५ मधील धनश्री नगर श्री. गेडाम ते श्री. महाडोळे यांच्या घरासमोरील रसत्यावर विद्युत पोल लावणे. |
| १७ | प्रभाग क्र.५ मधील विश्वकर्मा नगर न.प. शाळेच्या मागे श्री. शिवशंकर भोयर ते दिलीप गेडाम यांच्या घरासमोरील रसत्यावर विद्युत पोल लावणे. |
| १८ | प्रभाग क्र.५ मधील विश्वकर्मा नगर कुंदन चौक येथील श्री. राजू गेडाम यांच्या घरासमोरील रसत्यावर ०४ विद्युत पोल लावणे. |
| १९ | प्रभाग क्र.५ मधील विश्वकर्मा नगर नाग मंदिर जवळ श्री. कुसनाके, खाटीक यांच्या घरासमोरील रसत्यावर विद्युत पोल लावणे. |
| २० | प्रभाग क्र.५ मधील विश्वकर्मा नगर नाग मंदिर जवळ श्री. जयराम किन्हाके यांच्या घराजवळील चौफुलीवर एक हायमास्ट लावणे. |
| २१ | प्रभाग क्र. ५ बुटले ले आउट येथील श्री. परचाके यांच्या घरासमोरील मैदानात हायमास्ट बसविणे |
| २२ | प्रभाग क्र. ५ राजरतन नगर परिसर येथे विद्युत पोल उभारणे |
| २३ | प्रभाग क्र. २९ जांब रोड परिसरात जयवीर चौक ते श्री. उईके ते श्री. कनाके यांच्या घरापर्यंत स्ट्रीट लाईट उभारणी करणे |
| २४ | प्रभाग क्र. २९ जांब रोड पनपालीया टाइल्स ते अतुल पंढरे यांच्या घरापर्यंत (साई मंदिर परिसर) स्ट्रीट लाईट उभारणी करणे |
| २५ | प्रभाग क्र. २९ दत्ता हॉस्पिटल ते श्री. गावाने ते श्री. ठोंगारे ते महाजन कॉलेजपर्यंत स्ट्रीट लाईट उभारणी करणे |
| २६ | प्रभाग क्र. २९. गजानन महाराज मंदिर ते साई मंदिर ते रुद्र डेअरी पर्यंत स्ट्रीट लाईट उभारणी करणे |
| २७ | प्रभाग क्र. २९ अमृत सेलिब्रेशन ते श्री. हरितवाल सेलिब्रेशन पर्यंत स्ट्रीट लाईट उभारणी करणे |
| २८ | प्रभाग क्र. ३ विविध ठिकाणी विद्युत पोल व हायमास्ट उभारणी करणे. |

वरील सर्व  कामांस तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही करण्यास मा. मुख्याधिकारी, नगर परिषद यवतमाळ  यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे. सदर काम करण्यास येणाऱ्या खर्चास हि सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करते. पुढील कार्यवाही विद्युत विभागाने मुख्याधिकारी यांच्या आदेशाने पार पाडावी असे ही सभा ठरविते.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

( अँड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

स्थायी समीती सभा दिनांक २३/०४/२०२६ ठराव क्र.ची १५ प्रत

विषय क्र.१५ :- शहर स्वच्छतेच्या कामासाठी भाडेतत्त्वावर जेसीबी (JCB) मशीन उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

सुचक-सौ.लता रमेश ठोंबरे

अनुमोदक-सौ.पूजा मंगल गायकी

ठराव क्र. १५ :- नगर परिषद यवतमाळ शहराचा विस्तार आणि पावसाळापूर्व नियोजित स्वच्छतेची कामे लक्षात घेता, सध्या स्वच्छता विभागाकडे उपलब्ध असलेली यंत्रसामग्री अपुरी पडत आहे. शहरातील कचरा कुंडी जवळील कचरा उचलणे, अतिक्रमण काढणे, नगर सेवकाच्या तक्रारी नुसार जेसीबी पाठविणे, तातडीने सफाई करणे आणि कचरा डेपोवरील व्यवस्थापन सुलभ करण्यासाठी जेसीबी मशीनची आवश्यकता आहे. या अनुषंगाने प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सर्वानुमते आरोग्य विभागाचे वतीने सादर करण्यात आलेल्या पुरक टीप्पणी नुसार सदर कामाचे निविदा प्रक्रीयासह होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात आली. यापुढील कार्यवाही आरोग्य विभाग यांनी मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद, यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.१६ ची प्रत

विषय क्र.१६- स्वराज्याची दुसरी"महाराणी येसुबाई या नावाने यवतमाळ नगर परिषद हद्दीतील दारव्हा रोडवरील वर्मा ट्रॅक्टर शेजारील चौकाचे नामकरण करण्याकरीता सभेच्या माहीतीस्तव व योग्य निर्णयास सादर.

सुचक – श्री.प्रमोद भास्कर बगाडे
अनुमोदक – सौ.संगीता उमेश बोबडे

ठराव १६ :- प्रभाग क्र.२३ येथील सन्मानीय नगरसेवक श्री.प्रमोद बगाडे व सन्मानीय नगरसेविका सौ.संगीता बोबडे यांच्या अर्जानुसार स्वराज्याची दुसरी"महाराणी येसुबाई या नावाने यवतमाळ नगर परिषद हद्दीतील दारव्हा रोडवरील वर्मा ट्रॅक्टर शेजारील चौकाचे नामकरण करण्याकरीता या कार्यालयास सुचीत केल्याप्रमाणे सदर विषय चर्चा करुण योग्य निर्णयास सादर केल्याबाबत नियोजन विभाग प्रमुख यांनी सभेत कार्यालयीन टिप्पणी नुसार माहीती सादर केली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार स्वराज्याची दुसरी"महाराणी येसुबाई या नावाने यवतमाळ नगर परिषद हद्दीतील दारव्हा रोडवरील वर्मा ट्रॅक्टर शेजारील चौकाचे नामकरण करण्याकरीता मान्यता प्रदान करण्यात येत आहे.यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही शासन परिपत्र तपासुन नियोजन विभागानी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.१७ ची प्रत

विषय क्र.१७- यवतमाळ नगर परिषद हद्दीमध्ये दर्डा नगर येथील चेक पोस्ट नाका क्रांतीदुत सेवानिवृत्त पोलीस कल्याणकारी सेवाभावी न्यास यवतमाळ या संघटनेकरीता तात्पुतत्या स्वरुपात वापरण्यास परवानगी देण्याकरीता मा.सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करण्याबाबत.

सुचक – श्री.विलास उर्फ दत्ता वसंतराव कुळकर्णी
अनुमोदक – श्री.विशाल सुधाकर पावडे

ठराव १७ :- यवतमाळ नगर परिषद हद्दीमध्ये दर्डा नगर येथील पोस्ट नाका क्रांतीदूत सेवानिवृत्त पोलीस कल्याणकारी सेवाभावी न्यास,यवतमाळ या संघटनेकरीता तात्पुरत्या स्वरुपात वापरण्यास अर्जाव्दारे मागणी केली आहे व सदर अर्जामध्ये संस्था चेक पोस्ट ची देखभाल दुरुस्ती करण्यास तयार असल्याचे नमुद आहे.सदर प्राप्त अर्जानुसार विषय चर्चा करुण योग्य निर्णयास सादर केल्याबाबत नियोजन विभाग प्रमुख यांनी सभेत कार्यालयीन टिप्पणी नुसार माहीती सादर केली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार यवतमाळ नगर परिषद हद्दीमध्ये दर्डा नगर येथील पोस्ट नाका क्रांतीदूत सेवानिवृत्त पोलीस कल्याणकारी सेवाभावी न्यास,यवतमाळ या संघटनेकरीता तात्पुरत्या स्वरुपात वापरण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही शासन परिपत्रातील प्रशासकीय बाबी व अटी व शर्ती तपासुन नुसार नियोजन विभागानी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिर्जा अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.१८ ची प्रत

विषय क्र.१८- यवतमाळ नगर परिषद हद्दीमध्ये प्रभाग क्र.६ मधील जिल्हा परिषद कॉलनी मधील नगर परिषद चे सभागृह देखरेखी करीता हस्तांतरन करण्याकरीता मंजुरी घेण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव सादर करण्याबाबत.

सुचक – श्री.विशाल सुधाकर पावडे
अनुमोदक – सौ.वैशाली प्रविण सवाई

ठराव क्र.१८ - यवतमाळ नगर परिषद हद्दीमध्ये प्रभाग क्र.६ मधील जिल्हा परिषद कॉलनी मधील नगर परिषदेचे सभागृह देखरेखीकरीता हस्तांतरण करण्याकरिता अध्यक्ष,एलेव्हन स्टार क्रीडा मंडळ व्दारा संतोष जयस्वाल यांनी अर्जाव्दारे मागणी केली आहे.सदर अर्जामध्ये वरील सभागृह खाली असल्यामुळे तिथे मोठ्या प्रमाणात अवैध धंदे चालत असल्यामुळे सभोतालच्या परिसरातील नागरिक त्रस्त असल्याचे नमुद केले आहे त्यामुळे सदर सभागृह वरिल संस्थेला हस्तांतरीत केल्यास सदर संस्था वरील सभागृहाची देखभाल दुरुस्ती करण्याकरीता तयार असल्याचे नमुद केले आहे.यावर सदर सभागृह हस्तांतरण करण्याकरीता शासन निर्णयाव्दारे ई-लिलाव करुन सेवाभावी संस्था किंवा अभिकर्ता यांना देण्यात यावे करिता पूरक टीप्पणी नुसार नियोजन विभाग प्रमुख यांनी सभेपुढे सादर केली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चेमध्ये विरोधी पक्षनेत्या सौ.वैशाली प्रविण सवाई व स्थायी समीती सदस्य श्री.विशाल सुधाकर पावडे यांनी सदर विषय स्थगीत ठेवण्याबाबत पत्र सभेत सादर केले सदर पत्रामध्ये नमुद प्रमाणे प्रभागातील नागरिकांची मागणी नुसार यावर सर्वसामवेशक समीती स्थापन करण्यात येईल त्यानंतर सदर विषयचे अनुषंगाने निर्णय घ्यावा असे सभागृहात मत व्यक्त केले.त्यामुळे सदर विषय स्थगीत ठेवण्याबाबत मंजुरी प्रदान करण्यात आली.

यापुढील नियमानुसार कार्यवाही नियोजन विभाग यांनी मा.मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

" करीता ठराव स्थगीत ठेवण्यात येत आहे "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.१९ ची प्रत

विषय क्र.१९- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.२८ मधील उमरसरा यवतमाळ येथील तलावाचे सौदर्यीकरण करणेबाबतचे काम करण्यास्तव सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास सादर करुन शासनास सादर करण्याबाबत.

सुचक – सौ.अमृता ओमप्रकाश तिवारी
अनुमोदक – श्री.लोकेश वसंतराव इंगोले

ठराव १९ :- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.२८ मधील उमरसरा यवतमाळ येथील तलावाचे सौदर्यीकरण करण्याची मागणी प्रभाग क्र.२८ येथील सन्मानीय सदस्यांनी केली आहे सदर काम करण्याकरीता निधी मागणी शासनाकडून करण्याकरीता निधी मागणी शासनाकडून करण्याकरीता सदर कामाचा प्रस्ताव सादर करने आवश्यक आहे.वरिल मागणीच्या अनुषंगाने सदर कामे करण्याकरीता मा.सभा मंजुरी ठराव सह सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन प्रस्तावसह शासनाकडे पाठविण्यासंदर्भात नियोजन विभाग प्रमुख यांनी सभेत कार्यालयीन टिप्पणी नुसार माहीती सादर केली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली . चर्चेमध्ये प्रभाग क्र. १८ मधील सन्मानीय नगरसेविका सौ.अमृता ओमप्रकाश तिवारी यांनी कार्यालयानी सादर केलेल्या टिप्पणी मध्ये दुरुस्ती करुन प्रभाग क्र.१८ करावे कारण सद्यपरिस्थीतीमध्ये तलाव हे प्रभाग १८ चे सीमारेषेत आहे. चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार उमरसरा यवतमाळ येथील तलावाचे सौदर्यीकरण करणेबाबतचे काम करण्यास्तव सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास सादर करुन शासनास सादर करण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही नियोजन विभागानी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.२० ची प्रत

विषय क्र.२०- नगर परिषद निधी अंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र. ०१ ते प्रभाग क्र. २९ मध्ये विविध ठिकाणी असलेल्या उद्यानांची देखभाल व दुरुस्तीचे काम करण्यास्तव, तसेच न.प. मालकीच्या खुल्या जागेवर उद्यान तयार करून त्याचे देखभाल व दुरुस्तीचे काम करण्यास्तव, सदर कामास निविदा प्रक्रीया करण्यास व त्याबाबत होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

सुचक – सौ.रिता गजानन धावतोडे
अनुमोदक – श्री.पिंटु उर्फ नितीन काशीनाथ बांगर

ठराव २० :- नगर परिषद निधी अंतर्गत नियोजन आणि विकास विभाग मार्फत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र. ०१ ते प्रभाग क्र. २९ मध्ये विविध /नगर परिषद यवतमाळ ने विकसित केलेले उद्यानांची देखभाल व दुरुस्तीचे काम करणे व भविष्यात विविध ठिकाणी मा. अध्यक्ष महोदय, मा. उपाध्यक्ष तसेच सन्माननीय सभापती, सन्माननीय सदस्य व नागरिकांच्या मागणी नुसार खुल्या जागेवर उद्यान विकसित करण्याचे काम करायचे आहे.सबब खुल्या जागेमध्ये उद्यान विकसित केल्यास नागरीकांना सदर जागेचा सदउपयोग होईल व सध्यास्थिती मध्ये विकसित करण्यात आलेली उद्यान सुद्धा सदर काम केल्यास सुस्थिती मध्ये राहतील.करीता यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र. ०१ ते प्रभाग क्र. २९ मध्ये विविध ठिकाणी असलेल्या नगर परिषद मालकीचे उद्यानाची एक वर्षाकरिता देखभाल व दुरुस्ती करणे व खुल्या जागेवर उद्यान विकसित करणेचे काम करण्यास्तव तसेच सदर काम करण्यास निविदा प्रक्रिया करण्यास व सदर कामावर होणारा खर्च हा नगर परिषद निधी मधून करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करणे उचित राहील याबाबत कार्यालयीन टिप्पणी नुसार नियोजन विभाग प्रमुख यांनी सभागृहात माहीती सादर केली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र. ०१ ते प्रभाग क्र. २९ मध्ये विविध ठिकाणी असलेल्या नगर परिषद मालकीचे उद्यानाची एक वर्षाकरिता देखभाल व दुरुस्ती करणे व खुल्या जागेवर उद्यान विकसित करणेचे काम करण्यास्तव तसेच सदर काम करण्यास निविदा प्रक्रिया करण्यास व सदर कामावर होणारा खर्च हा नगर परिषद निधी मधून करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही नियोजन विभाग यांनी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.२१ ची प्रत

विषय क्र.२१- यवतामाळ नगर परिषदेतील बांधकाम विभागतील तसेच ईतर विभागातील विविध विकास कामांचा करारनाम्यात दोष दायीत्व कालावधी निच्चीत करण्याबाबतची अट लेखी स्वरुपात नमुद करण्याबाबतचा विषय चर्चेकरीता सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्याबाबत.

सुचक – श्री.विलास उर्फ दत्ता वसंतराव कुळकर्णी
अनुमोदक – श्री.भारत दिंगाबर ब्राम्हणकर

ठराव २१ :- नगर परिषदेमार्फत बांधकाम विभाग तसेच इतर विभागाच्या अंतर्गत विविध विकास कामे (रस्ते,नाली,इमारती तसेच किरकोळ दुरुस्ती इ राबविण्यात येत आहेत सदर कामाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी व कामामध्ये उध्वभणा-या त्रुटी वेळेत दुरुस्ती करण्यासाठी दोष दायीत्व कालावधी(Defect Liability Period)लागू करने आवश्यक आहे नगर परिषद यवतमाळ मार्फत होणा-या बांधकाम विषयक विविध विकास कामाचे कंत्राटदार सोबत करावयाचे करारनाम्यात महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२ दिनांक १४ जानेवारी २०१९नुसार कामातील उणिवांचे दुरुस्तीचा कालावधी निच्चीत करण्याबाबत अट टाकण्यास व त्याची कार्यालयीन स्तरावर अंमलबजावणी करणे याबाबत सन्मानीय उपाध्यक्ष यांचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असुन कार्यलयीन टिप्पणी नुसार नगर अभियंता यांनी सभेत माहीती सादर केली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२ दिनांक १४ जानेवारी २०१९ नुसार कामातील उणिवांचे दुरुस्तीचा कालावधी निच्चीत करण्याबाबत अट कोणत्याही कामाचे करारनामा मध्ये टाकण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही बांधकाम विभाग तसेच संबधीत विभगानी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.२२ची प्रत

विषय क्र.२२- यवतमाळ नगर परिषदेतील बांधकाम विभागात कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या स्थापत्य अभियंता श्री. निखील अ. ढबाले यांच्या कंत्राटास मुदतवाढ देण्याबाबत मंजुरीसाठीचा विषय चर्चेकरिता सर्वसाधारण सभेसमोर ठेवणेबाबत.

सुचक – श्री.विलास उर्फ दत्ता वसंतराव कुळकर्णी

अनुमोदक – अॅड.श्री.आनंद बळिराम गायकवाड

ठराव-२२ :-नगर परिषद बांधकाम विभाग यांचे वतीने ज्याअर्थी महाराष्ट्रराज्य नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१८/प्र.क्र.१३९/नवि१४दिनांक१२फेब्रुवारी२०१८अन्वयेनगरपरिषदयवतमाळकरितास्थापत्यअभियंताचेएकूण७पदे मंजूरआहे. त्यापैकीसध्यस्थितीत फक्त २ स्थापत्य अभियंता कार्यरत आहे. सन२०१६ पासून यवतमाळ नगर परिषदेची हद्दवाढ झाली असून त्यामध्ये एकूण ७ ग्रामपंचायतीचे समावेशन झालेले आहे. समावेशनानंतर नगरपरिषद यवतमाळ क्षेत्राची एकूण लोकसंख्या २,४८,९३९ एवढी वाढलेली असून क्षेत्रफळ ८१.५६ चौरस कि.मी. झालेलाआहे. तसेच नगरपरिषदयवतमाळसार्वत्रिकनिवडणूक२०२५मध्येनिवडूनआलेल्यामा. सदस्ययांच्या प्रभागात तसेच नवीन ग्रामपंचायतीचा भाग मूळ हद्दीत समाविष्ठ झाल्याने पायाभूत सुविधाचा विकास कामाचे बाबतीत पत्र तसेच निवेदने प्राप्त होत आहे. त्यामुळे सदरचा कंत्राट संपुष्टात आल्याने सद्यस्थितीत कार्यरत एकूण २ स्थापत्य अभियंतायांचाकडे कामाचा व्याप वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यवतमाळ शहराच्या हद्दवाढ झाल्यामुळे बांधकाम विभागामार्फत भुयारी गटारे योजना, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान, १४ वा वित्त आयोग विशेष रस्ता अनुदान, नागरी दलित्तेतर वस्ती सुधारणा योजना, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरीवस्ती सुधारणा योजना, वैशिष्ट्यपूर्ण योजना ई. विविध योजनेंतर्गत रस्ते, गटर, गार्डन्सचे कामे ई.कामे हद्दवाढ झाल्यामुळे वर्तमानातील कामावर परिणाम झालेला आहे. त्याअर्थी काम करण्यास अडचणी निर्माण होते आणि शासनाकडून किंवा वरिष्ठ कार्यालयाकडून वेळोवेळी मागविण्यात येणाऱ्या माहिती देण्यास विलंब होते. त्यानुसार निविदा प्रक्रिया करून कंत्राटी तत्वावर स्थापत्य अभियंता श्री. निखील अ. ढबाले यांना आदेश क्र. २१८ दि. १३/०३/२०२४ रोजी आदेश देण्यात आला होता. त्यानुसार सदर अभियंताची कामाची मुदत संपुष्टात येत आहे.

त्यानुसार यवतमाळ नगरपरिषद बांधकाम विभागातील विकास कामे जलदगतीने करावयाचे असल्याने रिक्त असलेल्या स्थापत्य अभियंता पदावर कंत्राटीपद्धतीने श्री. निखील अ. ढबाले यांना कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राट११ महिन्याची मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

करिता वरीलप्रमाणेकंत्राटी तत्वावर श्री. निखील अ. ढबाले, स्थापत्य अभियंता यांच्या कंत्राटास मुदतवाढ देण्याबाबतचा विषय मा.सर्वसाधारण सभेस मान्यतेकरीता सादर करण्यात येत असल्याची माहीती सभागृहात नगर अभियंता यांनी कार्यलयीन टिप्पणीचे वाचन करुन देण्यात येत आहे.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली चर्चेमध्ये मा.उपाध्यक्ष श्री.विलास उर्फ दत्ता कुळकर्णी .मा.नगरसेवक अॅड.आनंद गायकवाड,मा.नगरसेवक श्री.चंद्रशेखर चौधरी,मा.नगरसेवक श्री.पंकज देशमुख,नगरसेवक प्रा.डॉ.श्री.अमोल देशमुख,मा.नगरसेवक श्री.विशाल पावडे,मा.नगरसेवक श्री.लोकेश इंगोले यांनी यावेळी यांचेसोबत नगर परिषदेमध्ये कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेले स्थापत्य अभियंता श्री.सुनील शेरेकर व श्री.गजानन वातीले यांचा सुध्दा समावेश यामध्ये करण्यात यावे असे मत व्यक्त करीत सदर कर्मचारी हे जाहीरात देवून नगर परिषद प्रशासकीय सभा दि.४/२/२०२५ ठराव क्र.४ अन्वये ११ महीण्याचे कालावधीसाठी घेण्यात आले होते सदर कर्मचारी यांची मुदत ४/१/२०२६ पर्यत होती सदर कर्मचारी यांचे वेतन यांचे वेतन सुध्दा थकीत असल्यामुळे त्यांनी या कार्यालयास दीलेल्या सेवेबद्दल त्यांचे वेतन सुध्दा अदा करण्यात यावे.व सदर विषयाचे अनुषंगाने यामध्ये त्यांचे सुध्दा समावेशन करण्यात यावे.चर्चेअंती बांधकाम विभागाचे वतीने सादर करण्यात आलेल्या पुरक टिप्पणी नुसार स्थापत्य अभियंता पदावर कंत्राटीपद्धतीने श्री. निखील अ. ढबाले यांना कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राट११ महिन्याची मुदतवाढ देण्यात येत आहे.सोबतच सभागृहात सन्मानिय सदस्यांनी सुचना केल्यानुसार स्थापत्य अभियंता श्री.सुनील शेरेकर व श्री.गजानन वातीले यांचा सुध्दा कंत्राटी तत्वावर ११ महीण्याची मुदतवाढ देवून तीनही कंत्राटी स्थापत्य

अभियंता यांचे थकीत असलेल्या वेतनाचे अदायगी करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे .यापुढील शासकीय परिपत्रक तपासुन नियमानुसार कार्यवाही आस्थापना विभाग प्रमुख यांनी मा.मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

" करिता ठराव मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.२३ ची प्रत

विषय क्र.२३- नागपुर रोड व पांढरकवडा रोड जोडणारा नगर परिषदेच्या रिंग रोड वरील नाला तसेच आजुबाजूने नाली बांधकाम करणे हे काम आपत्ती व्यवस्थापण निधीतुन करण्यास तसेच या ठिकाणी तात्पुरते टिनाचे शेड (Shopping complex)उभारण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेबाबत.

सुचक – श्री.मो.शाकीर मो.नजीब
अनुमोदक – शाहीन परविन मोहम्मद नईम

ठराव २३ :- नगर परिषद हद्दीतील नागपुर रोड व पांढरकवडा रोड जोडणारा नगर परिषदेच्या रिंग रोड परिसरामध्ये पावसाळ्यात पानी साचणे व निच-याची अडचण निर्माण होणे ही समस्या वारंमवार उद्भवत आहे तसेच परिसरामध्ये बीबी अमेना उर्दु शाळा समोरील नाल्याच्या ठिकाणी पाणी निचरा होण्याकरीता पक्का नाला उपलब्ध नाही सदर समस्याच्या निकारणासाठी नागपुर रोड व पांढरकवडा रोड जोडणारा ठीकाणी प्रमुख नाल्यासह आजूबाजूच्या उपनाल्याचे बांधकाम करने आवश्यक आहे.तसेच सदर जागेचा तात्पुरत्या स्वरुपात उपयोग करुन नगर परिषदेस उत्पन्नचे साधन निर्माण करण्याचे द्रृष्ट्रीने टिनाचे शेड (Shopping complex)उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.यामध्ये रस्त्याची मालकी सार्वजनिक बांधकाम विभाग व भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरण(NHAI)आहे याबाबत तपासणी करुन शहर नियोजन नियमानुसार निर्णय घेणे असे प्रशासनाचे मत आहे त्या अनुषंगाने नमुद ठीकानी नाला बांधकाम तसेच आजूबाजूने नाली बांधकाम करण्याचे कामास तसेच तात्पुरते टिनाचे शेड (Shopping complex)उभारण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी करीता प्रस्ताव कार्यालयीन टिप्पणी नुसार सादर केल्याची माहीती नगर अभियंता यांनी सभेत दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली . चर्चेमध्ये मा.उपाध्यक्ष महोदय यांनी सदरची काम करणे गरजेचे असुन यामध्ये शिंदे नगर प्रभाग क्र.१९ मधील नाला सुध्दा आपत्ती व्यवस्थापण निधीतुन करण्याबाबतच्या प्रस्ताव पाठविण्याबाबत सुचना केली. चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार नागपुर रोड व पांढरकवडा रोड जोडणारा ठीकाणी प्रमुख नाल्यासह आजूबाजूच्या उपनाल्याचे बांधकाम व शिंदे नगर प्रभाग क्र.१९ मधील नाला चे बांधकाम आपत्ती व्यवस्थापण निधीतुन करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करुन शासनास मंजुरी करीता पाठविण्यास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करीत आहे. तसेच टिनाचे शेड (Shopping complex)उभारण्याचा प्रस्तावावर रस्त्याची मालकी सार्वजनिक बांधकाम विभाग व भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरण(NHAI)आहे याबाबत तपासणी करुन शहर नियोजन नियमानुसार निर्णयाचे अधीन राहुन मंजुरी देण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही बांधकाम विभाग मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.२४ ची प्रत

विषय क्र.२४- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र ०२ मधील शालीमार पार्क येथील फिरोज भंगारवाले (आसिफ पान सेंटर) ते बर्फ फॅक्टरी पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे हे काम सर्वसाधारण रस्ता अनुदान मधून करणे या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देनेबाबत.

सुचक – सौ.सविता अत्तरसिंग चव्हान
अनुमोदक – ॲड.श्री.आनंद बळीराम गायकवाड

ठराव क्र.२४- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र ०२ मधील शालीमार पार्क येथील फिरोज भंगारवाले ( आसिफ पान सेंटर) ते बर्फ फॅक्टरी दरम्यानचा रस्ता खराब अवस्थेत असून वाहतुकीस अडथळे निर्माण होत आहेत. सदर रस्त्यावर खड्डे असून पावसाळ्यात पाणी साचून राहते. सदर बाबी संदर्भात स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांचेकडून रस्ता दुरुस्ती बाबत मागणी प्राप्त झाली आहे. बांधकाम विभागामार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आलीन असून रस्त्याचे मजबुतीकरण करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याअनुषंगाने नमूद ठिकाणी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे हे काम सर्वसाधारण रस्ता अनुदान मधून करणे या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आल्याची माहीती नगर अभियंता यांनी सभागृहात कार्यालयीन टिप्पणीनुसार सादर केली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार प्रभाग क्र ०२ मधील शालीमार पार्क येथील फिरोज भंगारवाले ( आसिफ पान सेंटर) ते बर्फ फॅक्टरी दरम्यानचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबतचे काम सर्वसाधारण रस्ता अनुदान निधी मधून करण्यास व निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही बंधकाम विभाग यांनी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.२५ ची प्रत

विषय क्र.२५- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील खालील नमूद कामे सर्वसाधारण रस्ता अनुदान मधून करणे या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करणेबाबत सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर.

सुचक – श्री.विजय दयाराम राय
अनुमोदक – सौ.निता भास्कर केळापुरे

ठराव क्र.२५- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील खालील नमूद ठिकाणी रस्ते खराब अवस्थेत असून वाहतुकीस अडथळे निर्माण होत आहेत. सदर रस्त्यावर खड्डे असून पावसाळ्यात पाणी साचून राहते. सदर बाबी संदर्भात स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांचेकडून रस्ता दुरुस्ती बाबत मागणी प्राप्त झाली आहे. बांधकाम विभागामार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आलीन असून रस्त्याचे मजबुतीकरण करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे.

१)प्रभाग क्र १८ सुरज नगर मधील संतोष जयस्वाल यांच्या घारापासुन ते राजेश चमेडिया यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे

२)प्रभाग क्र ०८ शुभम कॉलनी मधील लोखंडे व बोरखडे यांच्या घरापासून ते प्लॉट नं १७३ महाजन यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता बांधकाम करणे

3)यवतमाळ नगर परिषद हद्दीतील पाच कंदील चौक ते हनुमान आखाडा ते अप्सरा टॉकीज पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे

४)प्रभाग क्र १२ पूनम चौक ते पिस्ता शॉप पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे

५)प्रभाग क्र. १२ मध्ये गणपती मंदिर ते सरोज टॉकिज ते मागच्या बाजूस लोकमत इमारत पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

६)प्रभाग क्र. १२ मध्ये श्याम टॉकिज चौक ते जनक ड्रेसेस पर्यंत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

७)प्रभाग क्र. १२ मध्ये नेहरू चौक ते सागर टेक्सटाईल (अझाज मैदान जवळ) मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

८)नगर परिषद हदीतील रंगोली ग्राऊंड ते मंजुषा मंगल कार्यालय पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण व रस्त्याचे कडेला पेव्हर ब्लॉक बसविणे

९)नगर परिषद हद्दीतील केशव पार्क नागपुर बायपास ते श्री. शुभम जयस्वाल यांचे घरापर्यंत रस्ताचे डांबरीकरण करणे

करिता वरील नमूद कामे सर्वसाधारण रस्ता अनुदान मधून निधीच्या उपलब्धतेनुसार तसेच प्राधान्यक्रमाने घेण्याबाबत तसेच नमूद कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर निर्णयार्थ ठेवण्यात येत असल्याची माहीती कार्यालयीन टिप्पणीनुसार नगर अभियंता यांनी सभागृहात सादर केली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार वरील नमूद कामे सर्वसाधारण रस्ता अनुदान मधून निधीच्या उपलब्धतेनुसार तसेच प्राधान्यक्रमाने घेण्याबाबत व निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही बांधकाम विभाग यांनी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.२६ ची प्रत

विषय क्र.२६- शुभमंगलम मंगल कार्यालय ते स्वावलंबी शाळा पर्यंत च्या मुख्यरस्त्याला राजमाता जिजाऊ मार्ग व राष्ट्रीय मार्गावरील चौकाला राजमाता जिजाऊ चौक यांचे नाव देण्याकरिता सभेच्या माहितीस्तव व योग्य निर्णयास सादर.

सुचक – श्री.भारत दिंगाबर ब्राम्हनकर
अनुमोदक – श्री.नित्यानंद अशोक गिरी

ठराव क्र.२६- उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने अहवाल सादर की, प्रभाग क्र. १७ येथील सन्माननीय नगरसेवक श्री.भारत ब्राम्हनकर यांच्या अर्जानुसार शुभमंगलम मंगल कार्यालय ते स्वाबलंबी शाळा पर्यंत च्या मुख्यरस्त्याला राजमाता जिजाऊ मार्ग व राष्ट्रीय मार्गावरील चौकाला राजमाता जिजाऊ चौक यांचे नाव देण्याकरिता या कार्यालयास दिलेल्या निविदनाचे अनुषंगाने सदर विषय मा.सभेच्या निर्णयास्तव सादर केल्याबाबतची कार्यालयीन टिप्पणी नुसार नियोजन विभाग प्रमुख यांनी सभागृहात दीली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार शुभमंगलम मंगल कार्यालय ते स्वाबलंबी शाळा पर्यंत च्या मुख्यरस्त्याला राजमाता जिजाऊ मार्ग व राष्ट्रीय मार्गावरील चौकाला राजमाता जिजाऊ चौक यांचे नाव देण्याकरिता मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही शासन निर्णय परिपत्रकाचे अधीन राहुन नियोजन विभाग यांनी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.२७ ची प्रत

विषय क्र.२७- नगर परिषद मधील बांधकाम विभागामार्फत नगर परिषद हद्दीतील विविध प्रभागामध्ये Hume Pipe पुरवठा करणे व बसविणे या कामाकरिता वार्षिक दर मागविणे करिता सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे बाबत.

सुचक – सौ.निता भास्कर केळापुरे

अनुमोदक – सौ.वैशाली प्राविण सवाई

ठराव क्र.२७- नगर परिषद मधील बांधकाम विभागामार्फत विविध प्रभागामध्ये पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी तसेच आवश्यक ठिकाणी पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या दृष्टीने Hume Pipe टाकण्याची कामे वेळोवेळी हाती घेण्यात येतात. सदर कामे तातडीने, नियोजनबद्ध व कार्यक्षमतेने पूर्ण होण्यासाठी पूर्वनियोजित दर असणे अत्यावश्यक आहे. त्यानुषंगाने Hume Pipe पुरवठा करणे व बसविणे या कामासाठी पात्र व नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडून वार्षिक दर मागविण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे जेणेकरून प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर विविध प्रभागामध्ये आवश्यकतेनुसार कामे हाती कामे तात्काळ हाती घेता येतील व अनावश्यक विलंब टाळता येईल. म्हणून नगर परिषद मधील बांधकाम विभागामार्फत नगर परिषद हद्दीतील विविध प्रभागामध्ये Hume pipe पुरवठा करणे व बसविणे कामासाठी वार्षिक दर मागवण्याबाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर निर्णयार्थ सादर करण्यात आल्याची माहीती नगर अभियंता यांनी सभागृहात कार्यालयीन टिप्पणी नुसार सादर केली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार Hume Pipe पुरवठा करणे व बसविणे या कामासाठी पात्र व नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडून वार्षिक दर मागविण्याची कार्यवाही निविदा प्रक्रीया राबवून करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही बांधकाम विभाग यांनी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

स्थायी समीती सभा दिनांक २३/०४/२०२६ ठराव क्र.ची २८ प्रत

विषय क्र. २८ :- नगर परिषद हद्दीतील खाजगी खुल्या प्लॉटवरील कचरा व झुडपे साफ करून, त्याकामी होणारा खर्च संबंधित मालमत्ता धारकाकडून वसूल करण्यास मान्यता देण्याबाबत.

सुचक-श्री.भारत दिगांबर ब्राम्हणकर

अनुमोदक-सौ.लता रमेश ठोंबरे

ठराव क्र. २८ :-नगर परिषद यवतमाळ शहरातील विविध नागरी वसाहतींमध्ये असलेल्या खाजगी मालकीच्या मोकळ्या भूखंडांवर (Open Plots) मोठ्या प्रमाणावर कचरा साचलेला असून तेथे जंगली झुडपे वाढली आहेत. यामुळे परिसरात अस्वच्छता पसरून डास व इतर कीटकांचा प्रादुर्भाव वाढला असून, नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे. या विषयावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. अनेक भूखंड धारकांना वेळोवेळी सूचना व नोटिसा देऊनही त्यांच्याकडून साफसफाईबाबत कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते. यावर उपाययोजना म्हणून, सर्वसाधारण सभा सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव मंजूर करत आहे:

१. ज्या खाजगी खुल्या प्लॉट धारकांनी नोटिसीच्या मुदतीत साफसफाई केलेली नाही, अशा भूखंडांवरील कचरा व झुडपे नगर परिषद स्वच्छता विभागातर्फे यंत्रसामग्री किंवा मजुरांद्वारे साफ करण्यास ही सभा प्रशासकीय मान्यता प्रदान करत आहे.

२. सदर साफसफाईसाठी येणारा प्रत्यक्ष खर्च संबंधित मालमत्ता धारकाकडून वसूल करण्यात यावा.

३. ही वसुलीची रक्कम संबंधित मालकाच्या 'मालमत्ता कर' (Property Tax) देयकामध्ये समाविष्ट करण्यास आणि ती वसूल करण्यास वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सर्वानुमते स्वच्छता विभागाचे वतीने सादर करण्यात आलेल्या पुरक टीप्पणी नुसार सदर कामाचे शहरातील स्वच्छता व आरोग्य अबाधित राखण्यासाठी, खाजगी खुल्या प्लॉटवरील साफसफाई नगर परिषदेमार्फत करून त्याचा खर्च मालकाकडून वसूल करण्याच्या धोरणास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात आली. यापुढील कार्यवाही स्वच्छता विभाग यांनी मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

(अॅड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद, यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.२९ ची प्रत

विषय क्र.२९- नगर परिषद यवतमाळ येथील नगर परिषद इमारत व परिसरात पान, खैनी, गुटखा, बिडी व अन्य तत्सम पदार्थांच्या वापरास बंदी घालण्याबाबत व बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी नियम व दंड निश्चित करण्याबाबत.

सुचक – श्री.भारत दिगांबर ब्राम्हनकर
अनुमोदक – सौ.वैशाली प्रविण सवाई

ठराव क्र.२९- नगर परिषद कार्यालय परिसर व इमारतीमध्ये येणाऱ्या नागरिकांद्वारे व कर्मचाऱ्यांद्वारे पान, खैनी, गुटखा, बिडी इत्यादी पदार्थांचे सेवन केले जात असून त्यातून परिसर अस्वच्छ होणे, थुंकीमुळे अस्वच्छता निर्माण होणे तसेच आरोग्यविषयक समस्या उद्भवण्याची शक्यता निर्माण होत आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने नगर परिषद कार्यालय व परिसर स्वच्छ ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे नगर परिषद इमारत व परिसरामध्ये पान, खैनी, गुटखा, बिडी व अन्य तत्सम पदार्थांचे सेवन व विक्री यास पूर्णपणे बंदी घालणे आवश्यक आहे. तसेच सदर बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत तरतूद करणे व संबंधित विभागामार्फत कठोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.नगर परिषद यवतमाळ कार्यालय व परिसरात पान, खैनी, गुटखा, बिडी व अन्य तत्सम पदार्थांच्या सेवनास व विक्रीस बंदी घालण्याबाबत व बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी नियम व दंड निश्चित करण्याबाबत सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर करण्यात आल्याची कार्यालयीन टिप्पणी नुसार माहीती स्वच्छता विभाग प्रमुख यांनी सभागृहात दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार नगर परिषद कार्यालय परिसर व इमारतीमध्ये येणाऱ्या नागरिकांद्वारे व कर्मचाऱ्यांद्वारे पान, खैनी, गुटखा, बिडी इत्यादी पदार्थांचे सेवन केले जात असून त्यातून परिसर अस्वच्छ होणे, थुंकीमुळे अस्वच्छता निर्माण होत असल्यामुळे यवतमाळ कार्यालय व परिसरात पान, खैनी, गुटखा, बिडी व अन्य तत्सम पदार्थांच्या सेवनास व विक्रीस बंदी घालण्याबाबत व बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यासाठी नियम व दंड शासकीय धोरणानुसार निश्चित करण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही स्वच्छता विभागानी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

# नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा
दिनांक- 23/04/2026
ठराव क्र- 30

**विषय क्र 30:** नगर परिषद यवतमाळ क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घरगुती कच-याचे संकलन व वाहतूक करणे तसेच सार्वजनिक ठिकाणावरील कचरा ट्रॅक्टरमध्ये भरून त्याची वाहतूक करणे तसेच नगर परिषद यवतमाळ हद्दीतील नाल्याची व रस्त्याची दैनंदिन साफ-सफाई करणेसाठी कार्यरत कंत्राटदार यांना मंजूर दरानुसार देयके अदा करणेसाठी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करणेसाठी सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर,

**सुचक**-श्री. नित्यानाद अशोक गिरी
**अनुमोदक**-श्री. चंद्रशेखर हरीकेशव चौधरी

**ठराव क्र.** 30- उपरोक्त विषयास अनुसरून सविनय सादर की, नगर परिषद यवतमाळ हद्दीतील घरोघरी तसेच व्यवसायिक उत्पादकाकडील निर्माण होणारा कचरा ओला, सुका, घरगुती घातक व सॅनिटरी वेस्ट अशा प्रकारे वर्गीकरण करून कचरा संकलन करणे तसेच नगर परिषदेच्या घनकचरा प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतूक करून त्यावर प्रक्रिया करणे हि कामे करण्याचे आदेश दिपक उत्तराधी, अमरावती यांना देण्यात आले आहेत. तसेच रस्त्याची साफ-सफाई केल्यानंतर निघालेला कचरा, सार्वजनिक ठिकाणी टाकण्यात आलेला कचरा व नाली उपसा केल्यानंतर निघालेला गाळ कचरा ट्रॅक्टरमध्ये भरून त्याची घनकचरा प्रक्रिया केंद्रापर्यंत वाहतूक करण्याचे तसेच नगर परिषद यवतमाळ हद्दीतील नाल्याची व रस्त्याची दैनंदिन साफ-सफाई करण्याचे काम ब्राम्हणे मल्टिसर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, यवताळ यांना देण्यात आले आहेत.

नगर परिषद यवतमाळ कडील दिनांक-09/09/2025 चे ठरावानुसार नवीन निविदा प्रक्रिया होईपर्यंत कार्यरत कंत्राटदार यांना मंजूर दराने कामे करणेसाठी मुदतवाढ आदेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार कार्यरत कंत्राटदार यांची माहे जानेवारी-2026 पासून पुढील देयके नगर परिषद निधी/ 15 वा वित्त आयोग निधीमधून अदा करणेसाठी मा. सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा प्रस्ताव येणा-या मा. सर्वसाधारण समितीच्या पटलावर ठेवणे गरजेचे आहे. सबब माहितीस व उचित आवेशास सविनय सादर.

वरीलप्रमाणे विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीचे सभेत वाचन करण्यात आले. त्यावर सर्वसाधारण सभेत विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली. त्यानंतर नगर परिषद यवतमाळ घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत घरगुती कच-याचे संकलन व वाहतूक करणे तसेच सार्वजनिक ठिकाणावरील कचरा ट्रॅक्टरमध्ये भरून त्याची वाहतूक करणे तसेच नगर परिषद यवतमाळ हद्दीतील नाल्याची व रस्त्याची दैनंदिन साफ-सफाई करणे या कार्यरत कंत्राटदार यांची थकित व चालू देयके मंजूर दरानुसार नगर परिषद निधी/ न.प मालकीची सर्व्हे क्र. 67 व 68 मधील जागा केंद्र शासनाच्या रेल्वे विभागास प्रकल्प बांधकाम करीता हस्तांतरित केल्यामुळे प्राप्त झालेल्या निधीमधून करणेसाठी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

पुढील कार्यवाहीचे आधिकार मुख्याधिकारी नगर परिषद यवतमाळ यांना सोपविण्यात येत आहेत.

**"करिता ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे."**

(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद, यवतमाळ

स्थायी समीती सभा दिनांक २३/०४/२०२६ ठराव क्र.ची ३१ प्रत

विषय क्र.३१ :- नगर परिषद यवतमाळ पाणी पुरवठा विभाग अंतर्गत शहरातील विविध ठिकाणी असलेल्या विद्यमान हातपंपांजवळ रेन वॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था उभारण्याबाबत.

सुचक-श्री.विलास उर्फ दत्ता वसंतराव कुळकर्णी

अनुमोदक-सौ.साधना रविंद्र शंभरकर

ठराव क्र. ३१ :- यवतमाळ शहरात उन्हाळयाच्या काळात उद्भवणारी पाणीटंचाई आणि भूगर्भातील खालावणारी जलपातळी ही अत्यंत चिंतेची बाब आहे. शहरातील सार्वजनिक हातपंप हे नागरिकांसाठी पाण्याचा महत्त्वाचा स्त्रोत आहेत. पावसाळ्यातील वाहून जाणारे पाणी शास्त्रोक्त पद्धतीने या हातपंपांच्या बोअरवेलमध्ये पुनर्भरण (Recharge) केल्यास भूजल पातळी वाढून हे हातपंप उन्हाळयातही कार्यान्वित राहू शकतील. या अनुषंगाने पाणी पुरवठा विभागाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सर्वानुमते पाणी पुरवठा विभागाचे वतीने सादर करण्यात आलेल्या पुरक टीप्पणी नुसार सदर कामाचे निविदा प्रक्रीयासह होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात आली. यापुढील कार्यवाही पाणी पुरवठा विभाग यांनी मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

"करीता ठराव सर्वानुमते मंजुर"

(अॅड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.३२ ची प्रत

विषय क्र.३२- नगरपरिषद यवतमाळ क्षेत्रातील धोकादायक पद्धतीने विविध वाढलेल्या झाडांच्या फांद्या कापणे तसेच वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या तक्रारीनुसार झाडाची कटाई करणे ही कामे करण्यासाठी अभिकर्ता नेमण्यासाठी सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सविनय सादर.

सुचक – श्री.अश्विन दिलीप बोपचे
अनुमोदक – श्री.पिंटु उर्फ नितीन काशीनाथ बांगर

ठराव क्र.३२ - नगरपरिषद यवतमाळ क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी झाडांच्या फांद्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या असून त्या रस्त्यांवर, विद्युत तारांवर तसेच सार्वजनिक ठिकाणी धोकादायक परिस्थिती निर्माण करीत आहेत. विशेषतः पावसाळा व वादळी वाऱ्याच्या काळात अशा फांद्या तुटून पडण्याची शक्यता अधिक असल्याने नागरिकांच्या जीवित व मालमत्तेस धोका निर्माण होतो. याबाबत मा. नगर परिषद सदस्य श्री अश्विन बोपचे यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.तसेच नगरपरिषदेस वेळोवेळी नागरिकांकडून झाडांच्या फांद्या कापणे व धोकादायक झाडे हटविण्या बाबत तक्रारी प्राप्त होत असतात. सदर कामे तात्काळ व कार्यक्षमतेने पार पाडण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामग्री उपलब्ध नसल्यामुळे कामात विलंब होत आहे. वरील बाबींचा विचार करता, नगरपरिषद क्षेत्रामध्ये

1. धोकादायक पद्धतीने वाढलेल्या झाडांच्या फांद्या कापणे,
2. तक्रारीनुसार झाडांची कटाई करणे.

ही कामे नियमित व सुरळीत पार पाडण्यासाठी अनुभवी व पात्र अभिकर्त्याची नेमणूक करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी नियमानुसार निविदा प्रक्रिया राबवून अभिकर्ता नेमणूक करण्यात यावी, जेणेकरून नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण होऊन सार्वजनिक सुरक्षितता सुनिश्चित करता येईल.नगर परिषद यवतमाळ सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर करण्यात आल्याची कार्यालयीन टिप्पणी नुसार माहीती स्वच्छता विभाग प्रमुख यांनी सभागृहात दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार नगरपरिषद यवतमाळ क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी झाडांच्या फांद्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या असून त्या रस्त्यांवर, विद्युत तारांवर तसेच सार्वजनिक ठिकाणी धोकादायक परिस्थिती निर्माण करीत या धोकादायक पद्धतीने वाढलेल्या झाडांच्या फांद्या कापणे व तक्रारीनुसार झाडांची कटाई करणे ही कामे नियमित व सुरळीत पार पाडण्यासाठी अनुभवी व पात्र अभिकर्त्याची नेमणूक करण्यात यावी याकरीता नियमानुसार निविदा प्रक्रिया राबवून अभिकर्ता नेमणूक करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही स्वच्छता विभागानी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.३३ ची प्रत

विषय क्र.३३- नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये धामणगाव रोडवरील मोहा फाटा चौकाला पुण्यश्लोक राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याकरिता सभेच्या माहितीस्तव व योग्य निर्णयास सादर.

सुचक – श्री.श्रीकृष्ण मारोती कांबळे

अनुमोदक – श्री.देविदास नामदेवराव अराठे

ठराव क्र.३३- माजी आमदार श्री. मदन येरावार यांनी नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये धामणगाव रोडवरील मोहा फाटा चौकाला पुण्यश्लोक राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याकरिता या कार्यालयास सुचित केले आहे. त्यानुसार कार्यालयीन टिप्पणी नुसार माहीती नियोजन विभाग प्रमुख यांनी सभागृहात दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेमध्ये मोहा फाटा येथील चौकाला ग्रामपंचायत अस्तीवात असताना सभा दि.१५/८/२०१५ ठराव क्र.७ नुसार स्व.गोपीनाथ मुंडे असे नामकरण करण्यात आले होते.त्यामुळे यावर चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये धामणगाव रोडवरील मोहा फाटा चौकाला पुण्यश्लोक राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबत प्रस्तावीत असल्यामुळे व सभागृहामध्ये झालेल्या चर्चेमध्ये मोहा ग्रामपंचायत अस्तीवात असताना सभा दि.१५/८/२०१५ ठराव क्र.७ नुसार स्व.गोपीनाथ मुंडे असे नामकरण करण्यात आले होते . त्यामुळे यावर असे ठरविण्यात आले की, पुण्यश्लोक राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याबाबतचे सुधारीत प्रस्ताव पुढील सभेमध्ये सादर करण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही नियोजन विभागानी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता पुढील सभेमध्ये सुधारीत प्रस्तावासह सादर करण्याबाबत मंजुर "

(अ‍ॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

# नगर परिषद सर्वसाधारण सभा दि. २३/०४/२०२६

## ठराव क्र. ३४

**विषय** :- यवतमाळ नगर परिषदेच्या विकास आराखड्यातील आरक्षण क्रमांक १०१ नझुल शिट क्रमांक ३८ ए, ३८ बी, भुखंड क्र. ०८, ९/१ (पैकी) मध्ये दुकान संकुल व सांस्कृतीक केंद्र बांधकाम करणे.

सूचक :- श्री. विलास उर्फ दत्ता वसंतराव कुळकर्णी

अनुमोदक :- श्री. नित्यानंद अशोक गिरी

यवतमाळ नगर परिषदेच्या विकास आराखड्यातील आरक्षण क्रमांक १०१ नझुल शिट क्रमांक ३८ ए, ३८ बी, भुखंड क्र. ०८, ९/१ (पैकी) मध्ये दुकान संकुल व सांस्कृतीक केंद्र बांधकामा करिता प्रस्तावित आहे. सदर जागेचे क्षेत्रफळ ७४३५.२० चौ.मी. आहे. सदर जागा हि शहराच्या मध्य वस्तीत असून सदर जागा हि नगर परिषदेच्या मालकीची आहे. या जागेवर आरक्षणानुसार आरक्षण विकसित करण्याच्या दृष्टीने या बांधकामाचे नकाशे मा. सहाय्यक संचालक नगर रचना, यवतमाळ यांचे पत्र क्र. १८४ दि.१८/०२/२०२५ अन्वये बांधकामास परवानगी मिळालेली आहे

या प्रकल्पातील मजले निहाय वापर व क्षेत्राचा तपशील खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

| अ. क्र. | बाब | क्षेत्रफळ चौ. मि. मध्ये | वापर |
|---|---|---|---|
| १ (a) | तळ मजला | २७४२.७२१ | Cultural Hall & Kitchen , 39 Shops |
| (b) | तळमजला | ४५२.५२३ | Cafeteria & Kitchen |
| २ (a) | पहिला मजला | १६८५.११६ | 40 Shops |
| (b) | पहिला मजला | ५५१.६२१ | Guest Room 16 Nos. |
| ३ (a) | दुसरा मजला | २८६१.१०३ | 40 Shops, Cultural Hall & Kitchen |
| (b) | दुसरा मजला | ५५१.६२१ | Guest Room 16 Nos. |
| ४ (a) | तिसरा मजला | १६८५.११६ | Office 09 Nos. Chambers 23 Nos. |
| (b) | तिसरा मजला | ५५१.६२१ | Guest Room 16 Nos. |
| ५ (a) | चौथा मजला | १३६०.९३१ | Office 09 Nos. Chambers 23 Nos. |
| (b) | चौथा मजला | ५५१.६२१ | Guest Room 16 Nos. |
| ६ (a) | पाचवा मजला | १३६०.९३१ | Office 09 Nos Chambers 23 Nos |
| (b) | पाचवा मजला | ५५१.६२१ | Guest Room 16 Nos. |
| ७ (a) | सहावा मजला | १३६०.९३१ | Office 09 Nos. Chambers 23 Nos. |
| (b) | सहावा मजला | ५५१.६२१ | Guest Room 16 Nos. |
| ८ (a) | सातवा मजला | १३६०.९३१ | Office 09 Nos. Chambers 23 Nos. |

| | | | |
|---|---|---|---|
| (b) | सातवा मजला | ५५१.६२१ | Guest Room 16 Nos. |
| एकुण | | १८७३१.६५ | |

**प्रकल्पाची एकुण किंमत**

१) जमिनीची किंमत :- रु. ७४३५.२० X १८७०० (१.९०१३८ ए) = रु. १३९०,२८,२४०/-

२) बांधकामाची किंमत :- रु. १०५,५६,७८,०००/- (अंदाजपत्रकानुसार)

३) **वार्षीक भाडे :-**

जमिन किंमत रु. १३,९०,३८,२४० x ०८% = रु. १,११,२३,०५९/-

बांधकामाची किंमत :- रु. १०५,५६,७८,००० x १०% = रु. १०,५५,६७,८००/-

एकुण = रु. ११,६६,९०,८५९/-

४) मालमत्ता कर :- (अ) रु.१५,०९,९०१/-

(ब) रु.१२,३०,१९६/-

**एकुण : रु. २७,४०,०९७/-**

सदर जागेवरील बांधकामाचे अंदाजपत्रक तयार केले असून बांधकामाची एकूण रक्कम रु. १०५,५६,७८,०००/- इतकी आहे. या बांधकामातून नगर परिषदेला वार्षिक भाडे रु. ११,६६,९०,८५९/- मिळणार आहेत. तसेच मालमत्ता करातून रु. २७,४०,०९७/- असे एकूण रु. ११,९४,३०,९५६/- रुपये उत्पन्न मिळणार आहे.

सदरचा प्रकल्प केंद्रशासनाच्या मुन्सिपल बॉड स्कीम (Municipal Bond Scheme) अंतर्गत मंजूर केल्यास नगरपरिषदेच्या उत्पन्नात वाढ होऊन नगर परिषदेकरिता उत्पन्नाचा स्त्रोत तयार होईल. व विकास योजनेतील आरक्षणाचा विकास होईल. याबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेअंती सदर विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आला. तसेच सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक, R.C.C design इत्यादी, या कामाचे तांत्रिक सल्लागार डिझाईन सेल नागपूर यांच्या कडून तयार करून घेऊन त्यास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेण्यात यावी. व यासाठी येणाऱ्या खर्चास, तांत्रिक तपासणी शुल्क व तांत्रिक सल्लागार यांचे शुल्कास व अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. याबाबतची पुढील कार्यवाही मुख्याधिकारी यांच्या मार्गदर्शनात बांधकाम विभागाने करावी.

" करिता ठराव मंजूर करण्यात येत आहे."

**(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)**

**अध्यक्ष**

**नगर परिषद यवतमाळ**

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.३५ ची प्रत

विषय क्र. ३५- नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये प्रभाग क्र. १७ मधील महाजन लेआऊट येथील महिला व बालकल्याण विभागांतर्गत बांधलेल्या सभागृहात अभ्याशिका मंजूर करून आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत या विषयास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्याकरिता सदर विषय सभेच्या माहितीस्तव व योग्य निर्णयासा सादर.

सुचक – श्री.भारत दिंगाबर ब्राम्हणकर
अनुमोदक – तब्बसुम मनवर शाह

ठराव क्र.३५- नगर परिषद यवतमाळ अंतर्गत महाजन लेआऊट येथील महीला व बालकल्याण विभाग अंतर्गत बांधलेल्या सभागृहामध्ये सार्वजनिक अभ्यासीका मंजुर करुन खालीलप्रमाणे आवश्यक साहीत्य उपलब्ध करुन देण्याबाबत सन्मानीय नगरसेवक यांचे अर्ज प्राप्त झाले.यामध्ये त्यांनी टेबल खुर्ची,पुस्तक कपाट/रॅक/एसी,पिण्याचे पाण्याची व्यवस्था,वाचनासाठी मुलभुत संदर्भ पुस्तके,स्वच्छता व देखभाल व्यवस्था मागणी प्रस्तावीत केली आहे.सदर विषयाकींत कामाची निविदा प्रसिध्द करण्यास व निविदा प्रक्रीयेनुसार सदर कामाचा अनुषंगाने होणा-या खर्च नगर परिषद निधी अंतर्गत प्राप्त निधी मधुन करण्यास प्रशासकीय व वीत्तीय मंजुरी मिळण्याबाबतचा विषय सभेच्या निर्णयास्तव सादर करण्यात आल्याची माहीती नगर अभियंता यांनी सभागृहात दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार नगर परिषद यवतमाळ हद्दीत महाजन लेआऊट येथील महीला व बालकल्याण विभाग अंतर्गत बांधलेल्या सभागृहामध्ये सार्वजनिक अभ्यासीका मंजुर करण्यात येत असुन त्याठीकाणी आवश्यक सुविधा टेबल, खुर्ची,पुस्तक कपाट/रॅक/एसी,पिण्याचे पाण्याची व्यवस्था,वाचनासाठी मुलभुत संदर्भ पुस्तके,स्वच्छता व देखभाल व्यवस्था करण्यास विषयाकींत कामाची निविदा प्रक्रीयेनुसार सदर कामाचा अनुषंगाने होणा-या खर्च नगर परिषद निधी अंतर्गत प्राप्त निधी मधुन करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही बांधकाम विभाग यांनी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.३६ ची प्रत

विषय क्र.३६- यवतमाळ नगर परिषद मालकीची सर्व्हे न.६७ व ६८ मधील जागा केंद्र शासनाच्या रेल्वे विभागास वर्धा नांदेड रेल्वे प्रकल्प बांधकाम करण्यासाठी हस्तांतरीत केलेल्या जागेच्या प्राप्त निधीबाबत सभेच्या माहीतीस्तव.

सुचक – सौ.वैशाली प्रविण सवाई
अनुमोदक – श्री.देविदास नामदेवराव अराठे

ठराव ३६ :- नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक- संकिर्ण-२०२५/प्र.क्र.५०१/न्वि-१८ दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ अन्वये यवतमाळ नगर परिषद हद्दीमधील सर्व्हे क्र.६७ व ६८ मधील ६७९२२.३१ चौ.मी.जागा वर्धा-नांदेड प्रकल्प या साठी केंद्र शासनाच्या रेल्वे विभागास महाराष्ट्र नगर परिषदा,नगर पंचायती व औदयोगीक नगरी अधिनियम,१६६५ चे कलम ९२(१)व कलम ३९६(ड)अन्वये,तसेच महाराष्ट्र नगर परिषदा(स्थावर मालमत्तेचे हस्तांतरण)नियम १९८३ च्या नियम २१ व नियम २६ मधील तरतुदीनुसार रुपये ४०,३१,४४,३८५/- इतके मुल्यांकन शुल्क आकारुन शासन मान्यता देण्यात आलेली आहे त्यानुसार यवतमाळ नगर परिषद साठी रक्कम रुपये ४०,३१,४४,३८५/-(चाळीस कोटी एकतीस लक्ष चौरेचाळीस हजार तीनशे पंच्याएंशी रुपये फक्त )इतका निधी दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी प्राप्त झालेला आहे सभागृहास अवगत करण्याकरीता ठेवण्यात आल्याची माहीती लेखापाल यांनी दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार निधी प्राप्त झाला.सदर निधी खर्च करण्याबाबत कोणताही शासन निर्णय तसेच वरिष्ठ कार्यालया कडून मार्गदर्शन नसल्यामुळे सदर निधी खर्च करण्याकरीता सभेसमोर ठेवावा. त्यानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात सर्वानुमते ठराव मंजुर करण्यात येत आहे.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.३७ ची प्रत

विषय क्र.३७- यवतमाळ नगर परिषद हद्दीतील केंद्रीय विद्यालयाला जोडणाऱ्या पोहोचमार्ग रस्त्याचे (approach road) खडीकरण व डांबरीकरण करणे या कामास जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करणेबाबत सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर.

सुचक – सौ.निता भास्कर केळापुरे
अनुमोदक – श्री.श्रीकृष्ण मारोती कांबळे

ठराव क्र.३७- नगर परिषद यवतमाळ हद्दीतील केंद्रीय विद्यालयाचे बांधकाम सध्या पूर्णत्वास येत आहे. सदर विद्यालयाकडे ये जा करण्यासाठी सुयोग्य व सुरक्षित पोचमार्ग रस्ता (approach road उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना, पालकांना तसेच नागरिकांना अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. मा. जिल्हाधिकारी यांनी सदर बाबीची दखल घेऊन केंद्रीय विद्यालयाला जोडणाऱ्या अॅप्रोच रोडचे बांधकाम नगर परिषद मार्फत करण्याबाबत मौखिक सूचना दिल्या आहेत.त्या अनुषंगाने अॅप्रोच रोडचे बांधकाम करणे आवश्यक आहे. नगर परिषद मधील बांधकाम विभागामार्फत सदर रस्त्याची पाहणी करण्यात आलीन असून रस्त्याचे मजबुतीकरण करणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे.म्हणून सदर कामासाठी अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यता घेऊन मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे निधी मागणीसाठी सदरचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सादर करण्याबाबतचा विषय मा.सर्वसाधारण सभेसमोर निर्णयार्थ ठेवण्यात येत असल्याची माहीती कार्यालयीन टिप्पणी नुसार नगर अभियंता यांनी सभागृहात दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार यवतमाळ नगर परिषद हद्दीतील केंद्रीय विद्यालयाला जोडणाऱ्या पोहोचमार्ग रस्त्याचे (approach road) खडीकरण व डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यता घेऊन मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे निधी मागणीसाठी सदरचा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सादर करण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही बांधकाम विभाग यांनी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.३८ ची प्रत

विषय क्र.३८- नगर परिषद यवतमाळ प्रशासकीय इमारतीच्या तळ मजल्यावर वाहन पार्किंग सुविधा सुधारण्याबाबत चा विषय सर्वसाधारण सभेसमोर ठेवणे.

सुचक – सौ.निता भास्कर केळापुरे
अनुमोदक – श्री.श्रीकृष्ण मारोती कांबळे

ठराव – ३८- नगर परिषद प्रशासकीय इमारतीच्या तळ मजल्यावर सध्या वाहन पार्किंग ची सुविधा अपुरी व अव्यवस्थित आहे. कर्मचारी तसेच नागरिकांच्या वाहनांची वाढती संख्या विचारात घेता सदर ठिकाणी नियोजनबद्ध पार्किंग व्यवस्था करणे अत्यावश्यक आहे. याबाबत मा. अध्यक्षा यांनी मौखिक सूचना दिल्या आहेत. त्यासाठी खालील प्रमाणे कामे प्रस्तावित आहेत

1. वाहनांच्या संरक्षणासाठी टीनाचे शेड उभारणे
2. पार्किंग शिस्तबद्ध करण्यासाठी पार्किंग पट्टी करणे
3. दोन चाकी वाहनासाठी स्वंतत्र प्रवेशद्वार निर्माण करणे

वरील कामे पूर्ण झाल्यास पार्किंग व्यवस्था सुलभ, सुरक्षित व सुव्यवस्थित होईल. सदर कामासाठी अंदाजपत्रक तयार करून आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेऊन बांधकाम विभागामार्फत काम हाती घेणे प्रस्तावित आहे. सदर विषय माननीय सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व निर्णयार्थ सादर करण्यात असल्याची माहीती कार्यालयीन टिप्पणी नुसार नगर अभियंता यांनी सभागृहात दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार नगर परिषद यवतमाळ प्रशासकीय इमारतीच्या तळ मजल्यावर वाहन पार्किंग सुविधा सुधारण्याबाबत1. वाहनांच्या संरक्षणासाठी टीनाचे शेड उभारणे 2. पार्किंग शिस्तबद्ध करण्यासाठी पार्किंग पट्टी करणे 3. दोन चाकी वाहनासाठी स्वंतत्र प्रवेशद्वार निर्माण करणे या कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करून प्रशासकीय कार्यवाही बांधकाम विभाग यांनी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

# नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा

दिनांक-23/04/2026

ठराव क्र- 39

**विषय क्र-39** नगर परिषद यवतमाळ अंतर्गत सावरगड स्थित घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे आग प्रतिबंधक व अग्निशमन यंत्रणा उभारण्याकरिता प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करणेसाठी सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर.

सूचक – सौ. कता रमेश टोंबरे

अनुमोदक– श्री. विशाल सुधाकर पावडे

**ठराव क्र 39-** नगरपरिषद यवतमाळ अंतर्गत सावरगड येथील घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे दररोज मोठ्या प्रमाणात कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येते. सदर ठिकाणी कचऱ्याच्या साठवणुकीमुळे व विघटन प्रक्रियेमुळे आग लागण्याचा संभाव्य धोका निर्माण होत असतो. विशेषतः उन्हाळयाच्या काळात आग लागण्याच्या घटना घडण्याची शक्यता अधिक असते.

सदर परिस्थिती लक्षात घेता, घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे आवश्यक ती अग्निशमन यंत्रणा (Fire Fighting System) उभारणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये पुढील बाबींचा समावेश होऊ आहे.

1. अग्निशमन पंप व पाण्याची टाकी व्यवस्था
2. फायर एक्स्टिंग्विशर (Fire Extinguishers)
3. फायर हायड्रंट सिस्टम
4. आपत्कालीन पाणी साठवण

त्याअनुषंगाने, सावरगड येथील घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे अग्निशमन यंत्रणा उभारण्यास मान्यता देणे व त्यासाठी आवश्यक निधी नगर परिषद निधीमधून खर्च करणेसाठी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करणेसाठी सदरचा विषय मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आलेला आहे.

वरीलप्रमाणे विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या कार्यालयीन टिपणीचे सभेत वाचन करण्यात आले. त्यावर सर्वसाधारण सभेत विषयावर विस्तृत चर्चा करण्यात आली. त्यानंतर नगर परिषद यवतमाळ अंतर्गत सावरगड स्थित घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे आग प्रतिबंधक व अग्निशमन यंत्रणा उभारण्याकरिता मंजूरी प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदर कामासाठी येणारा खर्च नगर परिषद निधीमधून करणेसाठी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

पुढील कार्यवाहीचे आधिकार मुख्याधिकारी नगर परिषद यवतमाळ यांना सोपविण्यात येत आहेत.

**"करिता ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे."**

(अॅड. प्रियदर्शनी अशोक उईके)

अध्यक्षा

नगर परिषद यवतमाळ

Scanned with OKEN Scanner

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.४० ची प्रत

विषय क्र.४०- दत्त चौक भाजी मार्केट मधिल खाली असलेले हॉल व दुकान भाडे तत्वावर देणे बाबत सभेच्या माहितीस्तव व योग्य निर्णयास सादर.

सुचक - श्री. सुभाष दयाराम राय.
अनुमोदक - श्री. विलास उर्फ दत्ता वसंतराव कुळकर्णी

ठराव - ४०-

नगरपरिषदेच्या मालकीचे दत्त चौक भाजी मार्केट मधिल खाली असलेले हॉल व दुकान हॉल हे सध्या रिक्त असून सदर हॉल व दुकान भाडेतत्त्वावर दिल्यास नगरपरिषदेस महसूल प्राप्त होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगर अधिनियम 1965 मधील तरतुदीनुसार तसेच शासनाच्या प्रचलित नियमांनुसार सदर हॉल ई-ऑक्शन / खुल्या लिलाव पद्धतीने भाडेतत्त्वावर देण्याची बाब सभेसमोर विचारार्थ ठेवण्यात आली.

सभेने सविस्तर चर्चा करून खालीलप्रमाणे ठराव बहुमताने मंजूर केला —

१)सदर हॉल व दुकान भाडेतत्त्वावर देण्याची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने ई-ऑक्शन / खुला लिलाव पद्धतीने राबविण्यात यावी.

२)सदर लिलावासाठी किमान आरक्षित भाडे रक्कम नगररचना मुल्यांकन विभागामार्फत निश्चित करण्यात यावे.

३)लिलावाची जाहिरात स्थानिक वृत्तपत्र, नगरपरिषद सूचना फलक व अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी.

४)लिलावातील सर्वाधिक दर देणाऱ्या पात्र बोलीदारास नियमानुसार हॉल व दुकान भाडेतत्त्वावर देण्यात यावे.

निवड झालेल्या भाडेकरूसोबत आवश्यक करारनामा करण्यात यावा व करारातील सर्व अटी व शर्ती लागू राहतील.
सदर कार्यवाही करण्याचे व आवश्यक आदेश निर्गमित करण्याचे अधिकार मुख्याधिकारी, नगरपरिषद यवतमाळ यांना प्रदान करण्यात येत आहेत.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद यवतमाळ

**नगर परिषद यवतमाळ सर्वसाधारण सभा दिनांक २३/०४/२०२६ चे सभेतील ठराव क्रं. ४१ ची प्रत.....**

विषय क्रं.४१ - यवतमाळ नगर परिषद हद्दीतील दाते कॉलेज ते तीन फोटो चौक रस्त्यांचे रूंदीकरण करण्यासाठी जागा अधिग्रहण करणेबाबत ......

सुचक - श्री.नित्यानंद अशोक गिरी

अनुमोदक - प्रा.अमोल ओंमकारराव देशमुख

ठराव क्रं.४१ - यवतमाळ शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ खाली शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्रं.टिपीएस-२७९५/१६००/सीआर-२५२/युडी-१३,दि.८/७/१९९८ अन्वये मंजूर करण्यांत आली आहे. तसेच या कायर्कालयाचे पत्र क्रं. १४३६,दिनांक २८/३/२०२५ अन्वये प्रारूप विकास योजना यवतमाळ(मुळ हद्द अधिक दु.सु व वाढीव क्षेत्र) शासनाच्या मंजुरीस्तव सादर करण्यांत आली आहे. सदर रस्ता रूंदीकरणामध्ये दाते कॉलेज ते तीन फोटा चौका पर्यतच्या १८ मिटर डि.पी.रस्त्याचे रूंदीकरणाचे कामामध्ये खाजगी जागा आवश्यक असल्याने ती जागा वित्तीय मोबदला किंवा टि.डी.आर. या स्वरूपामध्ये भुसंपादन करण्याकरीता सदरचा विषय सर्वसाधारण सभे समोर ठेवण्यांत येत आहे.

म.प्रा.नि.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतुदीनुसार शासकिय कामाकरीता खालील जंमिनीचे मालकांना वित्तय स्वरूपामध्ये किंवा टि.डी.आर. अंतर्गत जमिन नगर परिषदेला मोबदल्यामध्ये हस्तांतरीत करण्याच्या बदल्यात टिडीआर किवा रक्कम देणे बाबतचा प्रस्ताव देण्यांत येईल. सदरची भुसंपादनाची कार्यवाहीचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यवतमाळ यांचेकडे विहीत नमुन्यामध्ये सादर करणे आवश्यक आहे.

विकास योजना तयार करणे व विकास योजने अंतर्गत जमिनीचे भुसंपादन करणे या लेखा शिर्षा खाली विकास निधीची तरतुद करण्यांत आली आहे. तसेच सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकामध्ये सुध्दा वाढीव तरतुद करून टप्या-टप्याने भुसंपादना करीता निधी उपलब्ध करता येईल. <u>असे मुख्याधिकारी यांनी सभेमध्ये व्यक्त केले. सदर विषयावर सभेमध्ये विस्तुत चर्चा करण्यांत आली.</u>

यवतमाळ नगर परिषदेची मंजुर विकास योजना (सु) यवतमाळ मधील दाते कॉलेज ते तिन फोटो चौकापर्यतची खाजगी जागा वित्तीय स्वरूपामध्ये किंवा टि.डी.आर.स्वरूपामध्ये अंतर्गत उपरोक्त नमुद जमिनीचे भुसंपादनाचे प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सर्वानुमते प्रस्ताव मंजुर करण्यांत येत आहे. सदरचे प्रस्तावामध्ये नियमानुसार पुढील कार्यवाही मुख्याधिकारी यांनी करावी यास सभा मंजुरी देते.

"ठराव सर्वानुमते नामंजुर"

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोकराव उईके)
नगराध्यक्षा,
नगर परिषद,यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.४२ ची प्रत

विषय क्र.४२- नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये प्रभाग क्र. १२ मधील महात्मा फुले यांचे पुतळयाजवळ व राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे पुतळयाजवळ सौंदर्यीकरण करणे या विषयास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्याकरिता सदर विषय सभेच्या माहितीस्तव व योग्य निर्णयास सादर.

सुचक – श्री.विजय दयाराम राय
अनुमोदक – सौ.मनिषा योगेश भावे

ठराव क्र.४२- प्रभाग क्र. १२ मधील महात्मा फुले यांचे पुतळयाजवळ व राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे पुतळयाजवळ सौंदर्यीकरण करणे हे काम करण्याची मागणी श्री. पवन वि. थोटे, अध्यक्ष / सचिव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक समिती यवतमाळ यांचेकडून करण्यात आली आहे.नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये प्रभाग क्र. १२ मधील महात्मा फुले यांचे पुतळयाजवळ व राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे पुतळयाजवळ सौंदर्यीकरण करणे हे काम मागणी नुसार करणे गरजेचे असून विषयांकित कामाची निविदा प्रसिद्ध करण्यास व निविदाप्रक्रियेनुसार सदर कामाच्या अनुषंगाने होणाऱ्या खर्च नगर परिषद विकास निधी अंतर्गत प्राप्त निधी मधून करण्यास व निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणे बाबतचा प्रस्ताव सभेसमोर सादर करण्यात येत असल्याची माहीती नियोजन विभाग प्रमुख यांनी सभागृहात दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार प्रभाग क्र. १२ मधील महात्मा फुले यांचे पुतळयाजवळ व राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे पुतळयाजवळ सौंदर्यीकरण करणे सदर कामावर होणारा खर्च नगर परिषद विकास निधी अंतर्गत प्राप्त निधी मधून करण्यास व निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही नियोजन विभाग यांनी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

# नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा

## दिनांक- 23/04/2026

## ठराव क्र- 43

**विषय क्र:** 43- नगर परिषद यवतमाळ मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध विकास कामे व योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रसार-प्रचार करण्याकरिता संस्थेची नियुक्ती करण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करणेबाबत सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर.

**सुचक — सौ.सोनाली मनोज तिडके**

**अनुमोदक — श्री. विपुल पदमाकर खोब्रागडे**

**ठराव क्र 43**— नगर परिषद यवतमाळ मार्फत शहरामध्ये विविध विकास कामे तसेच शासनाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. तथापि, या कामांची व योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत नसल्यामुळे नागरिकांचा सहभाग अपेक्षेप्रमाणे वाढत नाही तसेच उपलब्ध सुविधांचा पूर्ण लाभ नागरिकांना मिळत नाही.

सदर बाब लक्षात घेता, नगर परिषदेमार्फत करण्यात येणाऱ्या कामांचा व योजनांचा व्यापक प्रसार-प्रचार करणे अत्यावश्यक आहे. यासाठी आधुनिक व प्रभावी माध्यमांचा वापर करून माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे, जसे की-

- सोशल मीडिया (Facebook, Instagram, WhatsApp इ.)
- डिजिटल प्लॅटफॉर्म व वेबसाइट
- होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स
- स्थानिक वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक माध्यमे
- जनजागृती मोहिमा व कार्यक्रम

वरील सर्व बाबी प्रभावीपणे राबविण्यासाठी अनुभवी व सक्षम प्रसार-प्रचार संस्था (Agency) नियुक्त करणे आवश्यक आहे. सदर संस्थेमार्फत खालील कामे करण्यात येतीलः

1. नगर परिषदेकडील विकास कामांची माहिती संकलित करून आकर्षक पद्धतीने सादर करणे.
2. विविध योजनांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करणे.
3. डिजिटल व प्रिंट माध्यमांद्वारे सातत्यपूर्ण प्रचार करणे.
4. नागरिकांच्या अभिप्रायाचे संकलन व विश्लेषण करणे.
5. आवश्यकतेनुसार विशेष मोहिमा (Campaigns) राबविणे.

सदर कामासाठी संस्थेची निवड ही प्रचलित शासन नियमांनुसार निविदा प्रक्रिया राबवुन करावी लागणार आहे. त्याकरिता येणारा खर्च नगर परिषद निधीमधून करावा लागणार आहे. करीता सदर प्रस्ताव बाबत संगणक विभागाच्या वतीने माहिती सभेपुढे वाचून दाखविण्यात आली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली, चर्चेअंती संगणक विभागाकडून सादर करण्यात आलेल्या टिपणी नुसार नगर परिषद यवतमाळ मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध विकास कामे व योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रसार-प्रचार करण्याकरिता संस्थेची नियुक्ती करण्याबाबत प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यापुढील कार्यवाही संगणक विभाग यांनी मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

**" करिता ठराव सर्वानुमते मंजूर"**

(ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.४४ ची प्रत

विषय क्र.४४ - नगर परिषद यवतमाळ क्षेत्रातील रस्त्यावरील अतिक्रमण काढल्यानंतर मोकळ्या झालेल्या जागांवर मोठे झाडे लावण्याकरिता कुड्या खरेदी करणेसाठी सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर.

सुचक – श्री.सुभाष दयाराम राय

अनुमोदक – श्री.विलास उर्फ दत्ता वसंतराव कुळकर्णी

ठराव क्र.४४- नगर परिषद यवतमाळ हद्दीतील विविध रस्त्यांवर अनधिकृत अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होणे, नागरिकांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण होणे तसेच शहराच्या सौंदर्यात बाधा येणे अशा समस्या निर्माण झालेल्या आहेत. सदर बाब लक्षात घेऊन नगर परिषदेमार्फत वेळोवेळी अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. अतिक्रमण काढल्यानंतर संबंधित ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होऊ नये तसेच शहर हरित व पर्यावरणपूरक करण्याच्या दृष्टीने त्या जागांवर मोठ्या झाडांची लागवड करणे व त्यांचे संरक्षण करण्यासाठी मजबूत GRC कुड्या बसविणे आवश्यक आहे.

यामुळे पुढील फायदे अपेक्षित आहेतः

1. पुन्हा अतिक्रमण होण्यास प्रतिबंध होईल.
2. शहरात हरित क्षेत्र वाढेल व पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होईल.
3. रस्त्यांचे सौंदर्य वाढेल व नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित वातावरण मिळेल.
4. प्रदूषण कमी करण्यास सहाय्य होईल.

सदर कामासाठी येणारा खर्च नगर परिषद निधीमधून करावा लागणार आहे. त्यासाठी आवश्यक त्या GRC कुड्या खरेदी करणेसाठी मा. सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करणेसाठी माहितीस व योग्य निर्णयास सादर केल्याची माहीती कार्यालयीन टिप्पणी नुसार नियोजन विभाग प्रमुख यांनी सभागृहात दिली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेमध्ये विरोधी पक्षनेत्या सौ.वैशाली प्रविण सवाई यांनी सदर विषयावर यापुर्वी सुध्दा अशाप्रकारे कुंड्या लावण्यात आले होत्या त्याबाबतची माहीती सभागृहात देण्यात यावी असे मत व्यक्त केले.चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार अतिक्रमण काढल्यानंतर संबंधित ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होऊ नये तसेच शहर हरित व पर्यावरणपूरक करण्याच्या दृष्टीने त्या जागांवर मोठ्या झाडांची लागवड करणे व त्यांचे संरक्षण करण्यासाठी मजबूत GRC कुड्या खरेदी करणेसाठी कार्यवाही करण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात येत आहे.. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही नियोजन विभाग यांनी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

# नगर परिषद यवतमाळ

## सर्वसाधारण सभा

## दिनांक- 23/04/2026

## ठराव क्र- 45

**विषय क्र: 45** - नगर परिषद यवतमाळ अंतर्गत येणाऱ्या विविध स्थावर मालमत्तांची नोंद ठेवण्यासाठी Asset Management Register तयार करणे तसेच सदर मालमत्तांची सद्यस्थिती पाहण्यासाठी संगणक प्रणाली आधारित Dashboard विकसित करण्याबाबत सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर

**सुचक — श्री. चंद्रशेखर हरीकेशव चौधरी**

**अनुमोदक — सौ. चैताली निलेश बेलोकार**

**ठराव क्र 45** — नगर परिषद यवतमाळच्या मालकीच्या विविध स्थावर मालमत्ता (जसे की इमारती, शाळा, दवाखाने, पाणीपुरवठा यंत्रणा, रस्ते, सार्वजनिक जागा, उद्याने इ.) मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आहेत. सदर मालमत्तांची अद्ययावत व व्यवस्थित नोंद एकत्रित स्वरूपात उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या व्यवस्थापनात अडचणी निर्माण होत आहेत.

सदर बाब लक्षात घेऊन नगर परिषदेमार्फत सर्व स्थावर मालमत्तांची सविस्तर माहिती (जसे की-स्थान, क्षेत्रफळ, उपयोग, सध्याची स्थिती, देखभाल स्थिती, फोटो, GPS लोकेशन इ.) समाविष्ट असलेला Asset Management Register तयार करणे आवश्यक आहे.

तसेच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या सर्व माहितीचे डिजिटल स्वरूपात संगणकीकरण करून एक Dashboard System विकसित करणे प्रस्तावित आहे. सदर Dashboard द्वारे पुढील सुविधा उपलब्ध होतील:

1. सर्व मालमत्तांची एकत्रित व अद्ययावत माहिती एका ठिकाणी पाहता येईल.
2. मालमत्तांची सद्यस्थिती (Condition Status) व देखभाल आवश्यकतेचे निरीक्षण करता येईल.
3. GIS/Location आधारित नकाशावर मालमत्ता पाहण्याची सुविधा उपलब्ध होईल.
4. निर्णय प्रक्रियेस मदत (Planning & Monitoring) होईल.
5. पारदर्शकता व उत्तरदायित्व (Transparency & Accountability) वाढेल.

सदर कामासाठी आवश्यक डेटा संकलन, नोंदणी, सॉफ्टवेअर विकास व Dashboard तयार करणे यासाठी अनुभवी संस्था/तांत्रिक एजन्सीची नियुक्ती प्रचलित शासन नियमांनुसार निविदा प्रक्रिया करून करणे आवश्यक आहे. त्याकरिता येणारा खर्च नगर परिषद निधीतून करावा लागेल. करीता सदर प्रस्ताव बाबत संगणक विभागाच्या वतीने माहिती सभेपुढे वाचून दाखविण्यात आली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली, चर्चेअंती संगणक विभागाकडून सादर करण्यात आलेल्या टिपण्णी नुसार नगर परिषद यवतमाळ अंतर्गत येणाऱ्या विविध स्थावर मालमत्तांची नोंद ठेवण्यासाठी Asset Management Register तयार करणे तसेच सदर मालमत्तांची सद्यस्थिती पाहण्यासाठी संगणक प्रणाली आधारित Dashboard विकसित/तयार करणेसाठी अनुभवी संस्था/तांत्रिक एजन्सीची नियुक्ती करण्याबाबत

प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यापुढील कार्यवाही संगणक विभाग यांनी मा. मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

**" करिता ठराव सर्वानुमते मंजूर"**

(ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.४६ ची प्रत

विषय क्र.४६- नगर परिषद यवतमाळ हद्दीतील विविध ठिकाणी असलेल्या स्मशानभूमी ची दुरुस्ती व स्थापत्य विषयक कामे करणे करिता प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्याबाबत चा विषय सभेच्या माहितीस व योग्य निर्णयास सादर.

सुचक – सौ.निता भास्कर केळापुरे
अनुमोदक – श्री.विशाल सुधाकर पावडे

ठराव – ४६- नगर परिषद हद्दीतील पांढरकवडा रोड, वडगाव, उमरसरा, भोसागावठाण, पिंपळगाव, वाघापूर, लोहारा, मोहा या ठिकाणी असलेल्या स्मशानभूमींची अवस्था पाहता तसेच पावसाळाच्या दृष्टीकोनातून त्या ठिकाणी दुरुस्ती तसेच ईतर आवश्यक स्थापत्य विषयक कामे करणे आवश्यक आहे. अनेक स्मशानभूमी मध्ये मुलभूत सुविधा अपुऱ्या असून दुरावस्था झालेली आहे. त्यानुसार आवश्यक निधी उपलब्ध करून देणे सदर कामांना प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे.म्हणून नगर परिषद हद्दीतील स्मशानभूमींच्या दुरुस्ती व ईतर स्थापत्य विषयक कामाबाबत चा विषय सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ व मान्यतेकरीता सादर करण्यात येत आहे.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली .चर्चेअंती कार्यालयीन टिप्पणी नुसार नगर परिषद हद्दीतील पांढरकवडा रोड, वडगाव, उमरसरा, भोसा गावठाण, पिंपळगाव, वाघापूर, लोहारा, मोहा या ठिकाणी असलेल्या स्मशानभूमींची अवस्था पाहता तसेच पावसाळाच्या दृष्टीकोनातून त्या ठिकाणी दुरुस्ती तसेच ईतर आवश्यक स्थापत्य विषयक कामे करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यापुढील नियमानुसार प्रशासकीय कार्यवाही बांधकाम विभाग यांनी मुख्याधिकारी यांचे आदेशाने करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.४७ ची प्रत

विषय क्र.४७ - सन्मानीय सदस्य यांनी सुचवलेली विकास कामांना प्रशासकीय व वित्तीय मंजुरीसाठी ठेवण्याबाबत.

सुचक – श्री.नित्यानंद अशोक गिरी

अनुमोदक – सौ.वैशाली प्रविण सवाई

ठराव-४७- नगर परिषद यवतमाळ येथील विविध प्रभागातेल सन्मानीय सदस्य यांनी त्यांच्या प्रभागातील रस्ता/नाली बंधकम तसेच विविध विकास कामे करण्यासंदर्भाचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे सदर कामाची अंमलबजावनी झाल्यास संबधीत प्रभागातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध होवून सार्वजनिक हित साध्य होईल .सन्मानीय सदस्य यांनी सुचविले कामे खालीलप्रमाणे असल्याची माहीती सभागृहात नगर अभियंता यांनी दिली.

| अ.क्र | कामाचे नाव |
|---|---|
| | नगर परिषद यवतमाळ हद्दीतील सर्वे नं १८/३ मौजा डोलंबा येथे असलेल्या गोडाऊन परिसरात गणराज वेअर हाउस जवळील रस्त्याचे डांबरीकरण करणे. |
| | यवतमाळ नगर परिषद हद्दीतील माईंदे चौक ते संकट मोचन पुलापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे . |
| | प्रभाग क्र ०१ गिरिजानगर येथे नितीन महाडोळे यांच्या घरापासून ते संदीप चोरडिया यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता बांधकाम करणे |
| | प्रभाग क्र ०१ गिरिजानगर येथे श्रीकांत कोहळे यांच्या घरापासून ते संदीप चोरडिया ते बनसोड यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट नालीचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्रमंक ०२ मध्ये आसिफ पान सेंटर( बीबी अमेना शाळे समोर) ते एम.ताहा आईस फॅकटरी पर्यंत रस्ता खडीकरण करणे |
| | प्रभाग क्र ०३ मधील तलाव फैल रोड, साईनाथ नास्ता सेंटर ते मा. जगदंबा फेब्रिकेटर पर्यंत कॉंक्रीट नालीचे बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्र ०३ शांताबाई वाघेला यांच्या घारापासून हरणखेडे ते भागडकर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. |
| | प्रभाग क्र ०३ गोदाम फैल मध्ये गोडबोले यांच्या घरापासून ते संतोष बोपचे यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता करणे. |
| | प्रभाग क्रमांक ४ येथे स्टेट बँक चौक ते वंजारी फैल पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे. |
| | प्रभाग क्र ०४ मधील वंजारी फैल येथे शाळा क्र ०४ ते डी.पी पर्यंत रस्ता कॉंक्रीटकरण करणे. |
| | प्रभाग क्र ०४ मधील नंदनवन सोसायटी येथे काळे यांच्या घरापासून ते कोरे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटकरण करणे. |
| | प्रभाग क्रमांक ०४ मधील कामगार नगर येथील डिबे ते नाल्याच्या पुलापर्यंत रस्ता कॉंक्रीटकरण करणे |
| | प्रभाग क्रमांक ०४ वंजारी फैल मधील उबाळे ते श्याम थोरात यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटकरण करणे |
| | प्रभाग क्रमंक ०५ धनश्री नगर येथे सिसोदिया ते कोठारी यांच्या घरापर्यंत खडीकरण व डांबरीकरण करणे |
| | प्रभाग क्र ०५ धनश्री नगर मध्ये सिसोदिया ते हनुमान मंदिर पर्यंत खडीकरण व डांबरीकरण करणे |
| | प्रभागक्र०६ विशाल नगर मधील जागृत हनुमान मंदिर ते कुणाल प्रोव्हिजन पर्यंत मुख्य रस्त्याचे रुंदीकरण, खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| | प्रभागक्र०६ गेडाम नगर मधील मोठा नाला अरुंद करणे तसेच गिरीनगर मधील श्री पुनवटकर ते रूढे यांच्या घरामागील नाल्याच्या सुरक्षा भिंतीची दुरुस्ती करणे. |
| | प्रभागक्र ०६ शिरभाते लेआउट लोखंडे प्लॉट येथील पिंपळगाव बायपास ते ठाकरे हॉस्पिटल पर्यंत रस्ता कॉंक्रीटकरण करणे. |
| | प्रभाग क्र ०६ अभिनव कॉलनी मधील चिंते ते भोयर,उमरतकर ते बिहाळे,निराळे ते लढ्ढा रस्ता खडीकरण,रुंदीकरण व डांबरीकरण करणे. |
| | प्रभागक्र०६ शिरभाते लेआउट लोखंडे प्लॉट येथील जांभुरे ते वाहूरवाघ,काळे ते लोकरे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटकरण करणे |
| | प्रभाग क्र ०७ सुरभी नगर मधील सागर शेंडे यांच्या घरापासून ते अष्टेकर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटकरण करणे. |

| | |
|---|---|
| | प्रभाग क्र ०७ गजानन नगर पिंपळगाव मध्ये श्री बावनकर यांचे घर ते श्री कोडापे यांच्या घरापर्यंत कॉक्रीट रोड व पेव्हिंग ब्लॉक बसविणे. |
| | प्रभाग क्र ०८ मधील सिद्धेश्वर नगर बोर्डापासून ते पटवारी यांच्या घरापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| | प्रभाग क्र ०८ शुभम कॉलनी मधील लोखंडे ते बोरखेडे ते प्लॉट नं १७३ मधील महाजन यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता बांधकाम करणे |
| | प्रभाग क्र ०८ शुभम कॉलनी बोर्डापासून प्लॉट नं १७३ डावीकडे महाजन यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता बांधकाम करणे |
| | प्रभाग क्र ०९ मधील शिवगडहॉटेल (मेनरोड) पासून तेकाळेबाईयांच्याघरापर्यंतकॉंक्रीट रस्ता तसेच साईमंदिर परिसरात सौंदर्यीकरण करणे. |
| | प्रभागक्र०९मधील किसनराव डोळे यांच्या डेरी पासून आगलावे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटकरण करणे. |
| | प्रभागक्र०९मधील श्री राठोड यांच्या घरापासून ते गुजर हॉस्पिटल पर्यंत रस्ता व नाली कॉंक्रीटकरण करणे. |
| | प्रभाग क्र ११ महेश नगरी मधील शेमणारी लेआउट कालांतरी यांच्या घरापासून ते राठी, हिंदोच्या ते पेट्रोलपंप च्या मागील बाजूपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. |
| | प्रभाग क्र ११ श्यांबजवार यांच्या घरापासून ते कोलाटकर यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट नालीचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्रमांक ११ मधील वाघापूर टॅक्स ऑफिस मधील खुल्या मैदानाला चैनलिंक फेन्सिंग आणि जॉगिंग ट्रॅक तयार करणे. |
| | प्रभाग क्रमांक १२ मधील श्री रोशन यादव ते श्री डोईजड ते देवी मंदिर ते जय हिंद चौक पर्यंत सिमेंटकॉंक्रिट नालीचे बांधकाम करणे. |
| | भाग क्रमांक १२ मधील टिळक स्मारक मंदिर ते चांदणी चौक पर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे |
| | प्रभाग क्र. १३ मधील न्यू प्रभात चौक ते भारत सेवा आखाडा पर्यंत रस्ता तयार करणे. |
| | प्रभाग क्र. १३ मधील श्री. नानाभाऊ हरसे ते श्री. नारायण रोकडे ते श्री. सुभाष सामंत ते श्री. विठ्ठल ठाकरे यांच्या घरापर्यंत नाली चे बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्र.१५ येथील नवाबपुरा मधील भुट्टोभाई यांच्या घरापासून ते साबीरभाई अंडेवाले यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट नाली तयार करून देणे. |
| | प्रभाग क्र.१५ येथील ए.बी. खान शाळे पासून ते इमरान मिस्त्री यांच्या घरा पर्यन्त अंदाजे ६० मिटररस्ता खडीकरण करून डांबरीकरण करून देणे. |
| | प्रभाग क्रमांक १६ पॅराडाइज कॉलनी येथे टावर जवळील जैनुल आबेदिन यांचे घरापासून ते फुरकाना बेगम यांच्या घरापर्यंत रस्ता खडीकरण करणे. |
| | प्रभाग क्रमांक १७ मधील आशीर्वाद गृह निर्माण सोसायटी भोसा मधील नगर परिषदच्या खुल्या जागेवर चेनलिंक फेन्सींग व सौंदर्यीकरण करणे |
| | प्रभाग क्र १९ मधील ज्ञानेश्वर मंदिर पासून ते मिलिंद सोसायटी ते शिंदे नगर मधील नाल्यापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| | प्रभाग क्र १९ मॉडर्न कवेलू भांडार ते जय भारत चौक पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| | प्रभाग क्र १९ उटाळे मिरची भांडार ते स्वामी समर्थ मंदिर पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| | प्रभाग क्र १९ सारस्वत लेआउट महादेव मंदिरा समोर मोठ्या नाल्याला सरंक्षण भिंत बांधणे व नाल्यावर पूल बांधणे. |
| | प्रभाग क्रमांक २० मधील विदर्भ हाऊसिंग सोसायटी मधील सांस्कृतिक भवनासमोरील खुल्या जागेवर पेव्हर ब्लॉक बसविणे |
| | भाग क्रमांक २० मधील श्री स्वामी समर्थ मंदीर परिसरामधील चारही बाजूच्या रस्त्याच्या दुतर्फा पेव्हर ब्लॉक बसविणे |
| | प्रभाग क्र २० विदर्भ हाऊसिंग सोसायटी बाजोरिया नगर मधील आदिशक्ती मेडिकल ते रेणुका मंगल कार्यालया पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. |
| | प्रभाग क्र २० विदर्भ हाऊसिंग सोसायटी अ)साई मंदिर ते घोडेराव ब) जवादे ते गुल्हाने क) कुडमेथे ते चुंबळे आणि |

| | |
|---|---|
| | गायकवाड ते स्वामी यांच्या कॉंक्रीट नालीचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्र २१ समर्थ वाडी येथे गुप्ता बिल्डींग ते काळे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे |
| | प्रभाग क्र २१ संताजी प्लॉट येथे श्री मोहरकर ते राजूरकर यांच्या घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे |
| | प्रभाग क्र २१ मधील डॉ. श्री. गुप्ता यांच्या दवाखान्यापासून ते मंगलम् वाटिका पर्यंत रस्त्याचे दुतर्फा पेव्हर ब्लॉक बसविणे |
| | प्रभाग क्र २१ श्री. क्षिरसागर यांच्या घरापासुन ते श्री पांडे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटकरण करणे |
| | प्रभाग क्रमांक २२ मधील श्री राजू डांगे ते देशमुख यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे. |
| | प्रभाग क्रमांक २२ मधील राधीका लेआऊट येथे श्री विश्वकर्मा मंदीर ते श्री महल्ले यांच्या घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण व रस्त्याच्या बाजूने पेव्हर ब्लॉक तसेच जगदीश जागीड ते मंदिरापर्यंत बंदिस्त नालीचे बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्र. २२ मध्ये सिंघानिया नगर येथे गुप्ता गल्ली मध्ये कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्र २३ पारीजात सोसायटी मधिल श्री. कामतकर ते श्री. धाये यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटकरण करणे |
| | प्रभाग क्र २३ पारीजात सोसायटी मधिल श्री. आडे ते श्री. पदमावार यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटकरण करणे |
| | प्रभाग क्र २३ श्री राज नगर मधील श्री गुळकरी ते इंगळे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटकरण करणे |
| | प्रभाग क्र २३ नंदनवन नगर मधील चक्रधर डेअरी ते कांतानंद भवन पर्यंत रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे |
| | प्रभाग क्रमांक २४ मधील मारोती शोरूम ते अजमिरे यांच्यापर्यंत सिमेंट कॉंक्रिट रोड बनविणे. |
| | प्रभाग क्र २४ ओम मौर्य वसाहत मध्ये इंजेवार यांच्या घरापासून ते उईके यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे |
| | यवतमाळ नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक २५ संत नामदेव नगर वडगाव येथे श्री नेतारे ते श्री जगताप ते श्री गायकवाड ते श्री भगत घरापर्यंत रस्त्याचे बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्र २५ मधील वडगाव येथील समाजमंदिर(साई हॉल)दुरुस्ती व सुशोभीकरण करणे |
| | प्रभाग क्रमांक २६ मधील एस. टी. कॉलनीमधील श्री गजानन महाराज मंदिर प्रांगनाला चेनलिंक फेन्सींग करणे |
| | प्रभाग क्रमांक २६ मधील एस. टी कॉलनी येथील श्री राधा कृष्ण मंदीर प्रांगणाला चेनलिंक फेन्सींग करणे |
| | प्रभाग क्रमांक २७ बालाजी सोसायटी मधील बालाजी मंदीर ते श्री बांगडकर यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे |
| | प्रभाग क्र २७ शिरे लेआउट येथील ओपन स्पेस मध्ये चैनलिंक फेन्सिंग करणे |
| | प्रभाग क्र २७ घनश्याम नगर येथे दोडके ते नरेंद्र राऊत यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट नालीचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्रमांक २९ गुरुकृपा नगर मधील श्री गुल्हाने ते काठोळे ते श्री दिनेश गुल्हाने यांच्या घरापर्यंतकॉंक्रिट नालीचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्रमांक २९ श्री आकाश चिंतावार यांचे घरापासून ते श्री चरपे ते श्री गोंडे ते श्री बढीये ते नाल्यापर्यंतकॉंक्रिट नालीचे बांधकाम करणे |
| | यवतमाळ नगर परिषद हद्दीतील झोन क्र ०१ मधील प्रभाग क्र १,२,६,११ व १२ मध्ये मुरूम पुरवठा करणे व पसरविणे चे काम करणे. |
| | यवतमाळ नगर परिषद हद्दीतील झोन क्र ०१ मधील प्रभाग क्र १३,१४,१५,१६ व १७ मध्ये मुरूम पुरवठा करणे व पसरविणे चे काम करणे. |
| | यवतमाळ नगर परिषद हद्दीतील झोन क्र ०२ मधील प्रभाग क्र ३,४,५ व ७ मध्ये मुरूम पुरवठा करणे व पसरविणे चे काम करणे. |
| | यवतमाळ नगर परिषद हद्दीतील झोन क्र ३ मधील प्रभाग क्र ८,९,१०,२२ व २३ मध्ये मुरूम पुरवठा करणे व पसरविणे चे काम करणे. |
| | यवतमाळ नगर परिषद हद्दीतील झोन क्र ३ मधील प्रभाग क्र व २४,२५,२६,२८ व २९ मध्ये मुरूम पुरवठा करणे व |

Pawar

| | |
|---|---|
| | पसरविणे चे काम करणे |
| | यवतमाळ नगर परिषद हद्दीतील झोन क्र ४ मधील प्रभाग क्र १८,१९,२०,२१ व २७ मध्ये मुरूम पुरवठा करणे व पसरविणे चे काम करणे |
| | प्रभाग क्र.२९ मध्ये श्री.रवीराज वासुदेव महल्ले ते श्री.जयंत राऊत ते श्री.महेश दहीवलकर ते श्री,नरडकर यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. |
| | नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये पोस्ट ऑफीस चौक ते धामणगांव चौक ते मोहा फाटा ते करळगांव रोडने दुभाजकामध्ये अस्तीत्वात असलेल्या विद्युत पोलवर डेकोरेटीव्ह एल.ई.डी.स्ट्रीट लाईट बसविणे. |
| | नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये प्रभाग क्र.२३ येथे विविध ठिकाणी विद्युत पोल उभारुन प्रकाश व्यवस्था करणे. |
| | प्रभाग क्र.२३ येथील एकविरा नगरी येथे विठ्ठल रुख्मीनी मंदीर बाजुला मेन रस्ता पासुन ते श्री.लोखंडे ते श्री.राठी यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. तसेच राठी यांचे घरासमोरील नाल्यावर पुल तयार करणे. |
| | प्रभाग क्र.६ येथे कुणाल सुपर बाजार ते आदर्श ग्रांऊड पर्यत स्ट्रीट लाईट बसविणे काम शासनाचे ठक्करबाप्पा आदीवासी वस्ती सुधारणा योजनेतुन करण्याबाबत. |
| | जागृत हनुमान मंदीर ते पिंपळगांव बायापास पर्यत स्ट्रीट लाईट बसविणे काम शासनाचे ठक्करबाप्पा आदीवासी वस्ती सुधारणा योजनेतुन करण्याबाबत. |
| | प्रभाग क्र.९ येथे विविध ठिकाणी विद्युत पोल उभारुन प्रकाश व्यवस्था करणे.हे काम शासनाचे ठक्करबाप्पा आदीवासी वस्ती सुधारणा योजनेतुन करण्याबाबत. |
| | नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये प्रभाग क्र.२५ मधील वाघाडी मधील संत रविदास नगर येथे श्री.नैताम यांचे घरापासुन मुख्य रस्ता बायपास रोड पर्यत विद्युत पोल उभारुन प्रकाश व्यवस्था करणे हे काम शासनाचे ठक्करबाप्पा आदीवासी वस्ती सुधारणा योजनेतुन करण्याबाबत. |
| | नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये प्रभाग क्र.२५ मधील वाघाडी येथे श्री.मोरकर यांचे घराजवळील तुळजा भवानी मंदीर जवळ हायमास्ट पोल उभारणे व सिता नगरी येथे श्री.राजु मडावी यांचे घराजवळ विद्युत पोल उभारणे काम शासनाचे ठक्करबाप्पा आदीवासी वस्ती सुधारणा योजनेतुन करण्याबाबत. |
| | नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये प्रभाग क्र.२५ मधील गोंडपुरा(गावठान) येथे विविध ठिकाणी विद्युत पोल उभारुन प्रकाश व्यवस्था करणे हे काम शासनाचे ठक्करबाप्पा आदीवासी वस्ती सुधारणा योजनेतुन करण्याबाबत. |
| | नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये प्रभाग क्र.२५ मधील मंगलमुर्ती नगर वसंराव उईके यांच्या घराजवळ ओपन स्पेस मध्ये हायमास्ट उभारुन प्रकाश व्यवस्था करणे. हे काम शासनाचे ठक्करबाप्पा आदीवासी वस्ती सुधारणा योजनेतुन करण्याबाबत. |
| | नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये प्रभाग क्र.२५ मधील श्री.सिडाम यांच्या घराजवळ एकविरा मंदीर जवळ ओपन स्पेस मध्ये हायमास्ट उभारुन प्रकाश व्यवस्था करणे. हे काम शासनाचे ठक्करबाप्पा आदीवासी वस्ती सुधारणा योजनेतुन करण्याबाबत. |
| | नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये प्रभाग क्र.२५ मधील इद्रायनी नगर येथे विविध ठिकाणी विद्युत पोल उभारुन प्रकाश व्यवस्था करणे. हे काम शासनाचे ठक्करबाप्पा आदीवासी वस्ती सुधारणा योजनेतुन करण्याबाबत. |

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चेअंती नगर अभियंता यांचेकडुन सादर करण्यात आलेल्या पुरक टीप्पणी नुसार सन्मानीय सदस्यांनी सुचविलेल्या प्रभागातील विकास कामांना प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.यापुढील अंदाजपत्रकीय तरतुदीचे अनुषंगाने निधीच्या उपलब्धतेनुसार नियमानुसार कार्यवाही नगर अभियंता व विषयानुसार संबधीत विभाग यांनी मा.मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.४८ ची प्रत

विषय क्र.४८ - लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अ.जा.वस्ती सुधार योजना अंतर्गत सन्मानीय सदस्य यांनी सुचविलेली कामे मंजुरीकरिता सर्वसाधारण सभेसमोर ठेवनेबाबत.

सुचक – सौ.निता भास्कर केळापुरे
अनुमोदक – ॲड.करुणा किसनराव तेलंग

ठराव-४८-मा.नगरसेवक यांनी त्यांच्या प्रभागातील अ.जा.वस्तीमध्ये आवश्यक असलेल्या विकास कामाबाबत या कार्यालयाला पत्राव्दारे कळविळे आहे सदर कामे स्थानीक नागरिकांच्या दैनदीन गरजासाठी आवश्यक असुन वस्तीच्या सर्वागीन विकासासाठी उपयुक्त आहेत.त्यानुसार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अ.जा वस्ती सुधार योजना अंतर्गत सन्मानीय सदस्य यांनी सुचविले कामे खालीलप्रमाणे असल्याची माहीती सभागृहात नगर अभियंता यांनी दिली.

| अ.क्र | कामाचे नाव |
|---|---|
| | प्रभागक्र०१मधील पंचशील चौक ते श्री शंकर वैरागडे ते भानुदास रामटेके यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता बांधकाम करणे |
| | प्रभागक्र०१मधील तलाव फैल येथील श्री चंद्रगुप्त रामटेके ते दिनेश लामसोंगे यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता बांधकाम करणे |
| | प्रभागक्र०१मधील धोबी घाट येथे गजानन चौधरी ते श्री दिलीप चुनारकर यांच्या घरापर्यंत काँक्रीट रस्ता बांधकाम करणे |
| | प्रभागक्र०१मधील पंचशील चौक येथील भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयाचे व परिसराचे सौंदर्यीकरण करणे. |
| | प्रभाग क्रमांक २ सेजल रेसिडेंसी येथील लढे यांच्या घरापासून निलिमा पाटील यांच्या घरापर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| | प्रभाग क्रमांक २ डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर नामफलक ते सागर पाटील यांच्या घरापर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे |
| | प्रभाग क्रमांक २ मधील राजू नान्ने ते आंबेडकर नगर नामफलकापर्यंत काँक्रीट रस्ता बांधकाम करणे |
| | प्रभाग क्र २ मधील वामनदादा कर्डक क्रीडा संकुल येथील मैदानात उत्तर- पूर्वेकडील खुल्या जागेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह बांधकाम करणे |
| | प्रभाग क्रमांक २ मधील रमाई पार्क भाग १ येथील भिक्खू कुटी समोरील खुल्या मैदानाला चेनलिंक फेंसिंग व पेव्हर ब्लॉक बसविणे. |
| | प्रभाग क्र ०२ मधील अभी गजभिये ते नीलिमा घुले यांच्या घरापर्यंत रस्त्याचे काँक्रीटकरण करणे. व रस्त्याच्या दोन्ही बाजूने नाल्या करणे |
| | प्रभाग क्र ०२ मधील वीटभट्टी चौकापासून सेजल रेसिडेन्सी मधील गौतम सोनटक्के यांच्या घरापर्यंत व गौतम खोब्रागडे यांच्या घरापासून ते सलीम सागवान यांच्या घरापर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| | प्रभागक्र ०२गौतम खोब्रागडे यांच्या घरापासून ते सलीम सागवान यांच्या घरापर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने नालीचे बांधकाम करणे . |
| | प्रभागक्र०२सलीम सागवान यांच्या घरापासून ते मखवानी यांच्या घरापर्यंत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूने नालीचे बांधकाम करणे |
| | प्रभागक्र०७ बोबडेलेआउटपिंपळगावयेथीलश्रीअजयधवणेयांच्याघरासमोरील खुल्याजागेत चेनलिंक फेन्सिंग व पेव्हर ब्लॉक बसविणे. |
| | प्रभाग क्र७ पिंपळगाव येथील श्री शेंडे ते रामटेके यांच्या घरासमोरील रस्त्याचे काँक्रीटकरण करणे. |
| | प्रभाग क्र ७ पिंपळगाव येथील मेनरोड ते फुलझेले यांच्या घरापर्यंत रस्त्याचे काँक्रीटकरण करणे. |

| | |
|---|---|
| | प्रभाग क्र ७ पिंपळगाव येथील श्री शंभरकर यांच्या घराजवळील न. प. च्या खुल्या जागेत जॉगिंग ट्रॅक व पेव्हर ब्लॉक बसविणे. |
| | प्रभाग क्र ७ पिंपळगाव येथील मेन रोड ते गजबे ते धोंगडे यांच्या घरापर्यंत रस्त्याचे काँक्रीटकरण करणे |
| | प्रभाग क्र. ०८ चिंतामणी नगर येथे त्रिरत्न बुद्ध विहार ते श्री. मनोहर ते श्री. गोल्डे ते श्री. झोड ते श्री. गोरे ते श्री. खडसे ते श्री. ढोले येथे रस्त्याचे डांबरीकरण बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्र. ०८ चिंतामणी नगर येथे श्री. कांबळे ते श्री. हुमणे ते श्री. मनवर येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे. |
| | प्रभाग क्र. ०८ सूर्योदय नगर मधील कांबळे ते गोंडे, झोड ते सिद्धेश्वर नगर नाल्या पर्यंत काँक्रीट नालीचे बांधकाम करणे. |
| | प्रभागक्र०८ शारदा नगर मध्ये नगराळे ते वीर, ते डहाके, ते मस्के, ते शारदा नगर बोर्ड पर्यंत रस्ताडांबरी करणकरणे. |
| | प्रभागक्र०८ मधील सूर्योदय नगर मधील राधाकृष्ण नगर येथे नाला बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्र. ०८ स्नेहल नगर येथे श्री. मोघरे ते श्री. मडकाम ते श्री. राउत ते श्री. खंडारे ते श्री. काळे ते श्री. कळसकर येथे रस्त्याचे डांबरीकरण बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्र 9 मधिल शिवाजीनगर परिसर मध्ये अंगणवाडी चे बांधकाम करणे. |
| | प्रभाग  क्र. 9. मधिल पंचशील नगर घेतील पेंदोर ते देऊळकर सिमेंट रस्ता व नाली बांधकाम करणे. |
| | प्रभाग  क्र. 9. मधिल अण्णाभाऊ साठे नगर येतील कांबळे ते चबूसकवार यांच्या घरा परेंत सिमेंट नाली बांधकाम करणे, |
| | प्रभाग  क्र. 9. मधिल अण्णाभाऊ साठे नगर येतील इंगळे ते मडावी सिमेंट रोड व नाला बांधकाम करणे. |
| | प्रभाग  क्र. 9. मधिल रेणुका नगर येतील बडे ते बेहरे यांच्या घरा परेंत सिमेंट रस्ता व रिटींग वॉल घेणे. |
| | प्रभाग क्र १० मधील नेताजी नगर येथील खुल्या जागेत चेनलिंक फेन्सिंग चे बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्र १० गजानन महाराज मंदिराजवळील खुल्या जागेवर चेनलिंक फेन्सिंग, वॉकिंग ट्रॅक व पेव्हर ब्लॉक बसविणे. |
| | प्रभाग क्र १० राऊत नगर मधील खुल्या जागेवर चेनलिंक फेन्सिंग, वॉकिंग ट्रॅक तयार करणे. |
| | प्रभाग क्र १० मधील सुखकर्ता नगरी खुल्या जागेवर चेनलिंक फेन्सिंग, वॉकिंग ट्रॅक तयार करणे. |
| | प्रभाग क्र १० मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळील खुल्या जागेवर चेनलिंक फेन्सिंग, वॉकिंग ट्रॅक व पेव्हर ब्लॉक बसविणे. |
| | प्रभाग क्रमांक ११ मधील संत रविदास महाराज मंदिर परिसरात चेनलिंक फेन्सिंग करणे व पेव्हर ब्लॉक लावून जॉगिंग ट्रॅक तयार करणे व सभागृहाची दुरुस्तीविषयक कामे करणे. |
| | प्रभाग क्रमांक ११ मधील संत रविदास सोसायटी येथील निखील भागवते ते चापके यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| | प्रभाग क्र ११ मधील बबन डहाके ते सुधीर नागदिवे ते महेंद्र गायकवाड ते नंदुरकर कॅम्पस पर्यंत काँक्रीट नालीचे बांधकाम करणे. |
| | प्रभाग १४ मधील महात्मा फुले चौक ते कळंब चौकापर्यंतचे दुतर्फा रस्त्याचे मजबुतीकरण कामी  खडीकरण व डांबरीकरण करणे |
| | प्रभाग १४ मधील सोनडवले यांच्या घरापासून ते वस्ताद लहूजी साळवे चौकापर्यंतचे खडीकरण व डांबरीकरण करणे |
| | प्रभाग १४ मधील प्रतिक कांबळे यांच्या घरापासून ते देशपांडे यांच्या घरापर्यंतचे खडीकरण व डांबरीकरण करणे |
| | प्रभाग १४ मधील रमाबाई आंबेडकर बुध्दं विहार ते दलित सोसायटी शौचालयापर्यंतचे खड्डीकरण व डांबरीकरण करणे |
| | प्रभाग १४ मधील तानसेन शेंडे यांच्या घरापासून ते टेंभूर्णे यांच्या  घरापर्यंत खड्डीकरण व  डांबरीकरण करणे |
| | प्रभाग १४ मधील अघम यांच्या घरापासून ते कुंभारेच्या घरापर्यंतखडीकरण व डांबरीकरण करणे |
| | प्रभाग १४ मधील अण्णाभाऊ साठे चौक ते जयभिम चौक पर्यंतचे खडीकरण व डांबरीकरण करणे |
| | प्रभाग १४ मधील अशोक नगर परिसरातील बाबाराव तेलंग यांच्या घरामागुन ते नरेश वंजारी यांचे घरापर्यंत कॉक्रिट नाली बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्रमांक १७ मधील श्री राहुल खंतडे ते श्री कांबळे ते श्री बेताल श्री गौतम कांबळे ते श्री थूल ते श्री विंधन विहीर पर्यंत काँक्रीट  नालीचे बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्रमांक १७ मधील श्री मेश्राम ते श्री प्रेमानंद पाटील पर्यंत श्री जयपाल मुनेश्वर ते श्री साठे पान ठेला ते किशोर सरघ यांच्या घरापर्यंत काँक्रीट  नालीचे बांधकाम करणे. |

| | |
|---|---|
| | प्रभाग क्रमांक १७ मधील विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यामागील नगर परिषद खुल्या जागेवर चेनलिंग फेन्सिंग जॉगिंग ट्रॅक तयार करणे तसेच सौंदर्यीकरण करणे. |
| | प्रभाग क्रमांक १७ मधील श्री साठे पान सेंटर ते मुख्य नाल्यापर्यंत काँक्रीट रोडचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्र १८ मधील व्यंकटेश नगर मधील खुल्या जागेत समाज भवन व जॉगिंग ट्रॅक तयार करणे. |
| | प्रभाग क्र १८ मधील गुरुनानक नगर मध्ये जॉगिंग ट्रॅक व मोठा नाला करणे ते काली माता मंदिरा पर्यंत तयार करणे. |
| | प्रभाग क्रमांक १८ मधील कविता भोयर यांच्या घरासमोरील काँक्रीट रोडचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्र २८ मधील दाते कॉलेज रोड ते तीन फोटो चौक मार्गे विश्वशांती बौद्ध विहारापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण करून रस्त्याचे दोन्ही बाजूने कॉक्रीट नालीचे बांधकाम करणे तसेच पेव्हर ब्लॉक चे बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्र २८ मधील उमरसरा स्मशान भूमीकडे जाणाऱ्या ( मोक्षधाम ते श्री महेश धुळे यांच्या घरापर्यंत) रस्त्याचे कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्रमांक २८ मधील हेमंत कांबळे ते नीलिमा राउत यांच्या घरापर्यंत काँक्रीट रोडचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्रमांक २८ मधील फुलझेले यांच्या घरापासून वंजारी यांच्या घरापर्यंत काँक्रीट रोडचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्रमांक २८ मधील देवस्थळे यांच्या घरापासून ते अतकर यांच्या घरापर्यंत काँक्रीट रोडचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्रमांक २८ मधील गोवर्धन लेआउट मध्ये तडसे यांच्या घरापसुन ते फुलझेले यांच्या घरापर्यंत काँक्रीट रोडचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्रमांक २८ मधील देशभ्रतार लेआउट मध्ये सागर नाईक ते देवराव नरांजे यांच्या घरापर्यंत काँक्रीट रोडचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्रमांक २८ मधील हेमंत कांबळे ते नीलिमा राउत यांच्या घरापर्यंत काँक्रीट रोडचे बांधकाम करणे |
| | प्रभाग क्र ०७ मधील श्री वैद्य, नरगडे,शेळके, तायडे,मेश्राम ,सावंत यांचे घर ते जुना चांदूर रेल्वेला जोडणारा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे |
| | प्रभाग क्र ०७ मधील श्री बंडू रामटेके ते वंदना पाटील ते नालंदा बुद्ध विहारपर्यंत रस्ता काँक्रीटकरण करणे |
| | प्रभाग क्र ०७ भाऊराव डांगे ते मेश्राम ते रवी कुडवे यांच्या घरापर्यंत रस्ता काँक्रीटकरण करणे |
| | प्रभाग क्र.६ शंकर नगर मधील राऊत ते प्रताप सोळंके यांच्या घरापर्यत क्रांक्रीट नाली बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्र.६ शंकर नगर मधील पहाटवारा इमारत ते स्वामी ते कांबळे यांच्या घरापर्यत क्रांक्रीट नाली बांधकाम करणे. |
| | प्रभाग क्र.६ शंकर नगर मधील श्री.स्वामी यांच्या घराजवळील रस्ता क्रांक्रीटीकरण करणे. |
| | प्रभाग क्र.६ शंकर नगर मधील खुल्या जागेचे चेनलिंग फेंसींग,जॉगिंग ट्रॅक तयार करणे. |

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चेअंती नगर अभियंता यांचेकडुन सादर करण्यात आलेल्या पुरक टीप्पणी नुसार सन्मानीय सदस्यांनी सुचविलेल्या प्रभागातील विकास कामांना प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.यापुढील अंदाजपत्रकीय तरतुदीचे अनुषंगाने निधीच्या उपलब्धतेनुसार नियमानुसार कार्यवाही नगर अभियंता व विषयानुसार संबधीत विभाग यांनी मा.मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

सर्वसाधारण सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.४९ ची प्रत

विषय क्र.४९- नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये १ एप्रील २०२६ पासुन सुरु होणा-या जणगणनेमध्ये ओबीसी सहीत सर्व जातीचा जातनिहाय जणगणना करने या विषयास सर्वसाधारण सभेची मंजुरी घेण्याकरीता सदर विषय सभेच्या माहीतीस्तव व निर्णयास सादर.

सुचक – सौ.वैशाली प्रविण सवाई
अनुमोदक – सौ.स्वाती अभिलाष खंडारे

ठराव क्र.४९ - यवतमाळ नगर परिषद हद्दीमध्ये १ एप्रील २०२६ पासुन सुरु होणा-या जणगणनेमध्ये ओबीसी सहित सर्व जातीची जात निहाय जणगणना करण्याची मागणी सन्मानीय सदस्य यांनी मा.नगराध्यक्ष महोदया व प्रशासनाकडे केली आहे.तरी नगर परिषद यवतमाळ हद्दीमध्ये १ एप्रील २०२६ पासुन सुरु होणा-या जणगणनेमध्ये ओबीसी सहित सर्व जातीची जात निहाय जणगणना करुन शासनास प्रस्ताव पाठविण्याकरिता सदर विषय पूरक टीप्पणी नुसार जणगणना विभाग प्रमुख यांनी सभेपुढे सादर केली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चेमध्ये विरोधी पक्षनेत्या सौ.वैशाली प्रविण सवाई यांनी दि.२५/३/२०२६ व नगरसेविका सौ.स्वाती अभिलाष खंडारे यांनी दि.२/२/२०२६ रोजी सर्वसाधारण सभेपुढे चर्चेकरीता व प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत मा.नगराध्यक्ष महोदया व प्रशासनाकडे निवेदन सादर केल्यानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात मत व्यक्त केले. चर्चेअंती यवतमाळ नगर परिषद हद्दीमध्ये १ एप्रील २०२६ पासुन सुरु होणा-या जणगणनेमध्ये ओबीसी सहित सर्व जातीची जात निहाय जणगणना करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासंदर्भात मंजुरी प्रदान करण्यात आली.

यापुढील नियमानुसार कार्यवाही जणगणना विभाग यांनी मा.मुख्याधिकारी यांचे आदेशानुसार करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्षा
नगर परिषद यवतमाळ

**यवतमाळ नगर परिषद यवतमाळ**

**सर्वसाधारण सभा दिनांक २३.०४.२०२६**

**ठराव क्रमांक :- ५०**

**विषय** : महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) (सुधारणा) नियम, २०२४ (वित्त विभाग, दिनांक ०८/०२/२०२४) तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.६४/सेवा-४, दिनांक ०७/०१/२०२५ अन्वये नगर परिषद यवतमाळ येथील सेवा निवृत्त कर्मचारी / निवृत्तिवेतनधारक यांच्या मृत्यूनंतर पात्र वारसांना कुटुंब निवृत्तिवेतन लागू करून लाभ अदा करणे बाबत होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत.

**सूचक** : प्रा. डॉ. श्री. अमोल ओंकारराव देशमुख

**अनुमोदक** : ॲड. श्री. आनंद बळीराम गायकवाड

**ठराव** : महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ७६ अन्वये आयुक्त तथा संचालकांना असलेल्या अधिकारांनुसार नगर परिषद कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करण्यात आलेले आहेत.

तसेच सुधारित स्थायी निदेश क्र. २४–२०२५ मधील अ (१) नुसार नगर परिषद आस्थापना कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक बाबी व अनुज्ञेय लाभांसाठी महाराष्ट्र नागरी सेवा नियम जसेच्या तसे लागू असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

वित्त विभागाच्या शासन अधिसूचना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) (सुधारणा) नियम २०२४ वित्त विभाग ०८/०२/२०२४ आणि शासन महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण - २०२४/प्र.क्र.६४/सेवा-४, दिनांक ०७.०१.२०२५ व निर्णयानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती) नियम १९८२ मध्ये सुधारणा करण्यात आलेली असून, त्यानुसार शासकीय कर्मचाऱ्याच्या / निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्यूनंतर खालील पात्र वारसांना कुटुंब निवृत्तिवेतन देण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत :-

१. अविवाहित, घटस्फोटित किंवा विधवा मुलगी,
२. मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेले अपत्य,
३. शारीरिकदृष्ट्या पांगळेपण किंवा विकलांगता असलेले अपत्य, (कमीतकमी ४०%)
४. सद्यस्थितीत नगर पालिकेत ४ अर्ज सदरची निवृत्तीवेतन मिळण्याकरिता त्यांच्यावर सर्वस्वी अवलंबून असलेल्या मुलींनी अर्ज सादर केलेला आहे. त्यांचे नाव येणे प्रमाणे
   - I. श्रीमती कविता हिरालाल मेंढे
   - II. श्रीमती नंदा सुखदेव घोगलिया
   - III. श्रीमती ममता रंजित गुजरे
   - IV. श्रीमती वंदना केशवराव चेंडकापुरे
   - V. तसेच या नंतर प्राप्त होणाऱ्या अविवाहित, घटस्फोटित किंवा विधवा मुलगी, मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेले अपत्य, शारीरिकदृष्ट्या पांगळेपण किंवा विकलांगता असलेले अपत्य, (कमीतकमी ४०%) अश्या अपत्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर कुटुंब निवृत्तीवेतनचे लाभ उक्त शासन निर्णयानुसार अदा करण्याबाबत विचार करून उचित निर्णय घेणे.

सभेत सदर नियमाअंतर्गत प्रलंबित प्रकरणांवर संपूर्ण कार्यवाही करून संबंधित पात्र वारसांना अनुज्ञेय लाभ अदा करण्यासाठी होणाऱ्या खर्चास वित्तीय व प्रशासकीय मंजुरी आवश्यक असल्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

सदर पात्र वारसांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती) नियम १९८२ च्या तरतुदीनुसार कुटुंब निवृत्तिवेतन लागू करून लाभ अदा करणे बंधनकारक आहे. नगर परिषद यवतमाळ मधील काही सेवा निवृत्त कर्मचारी / निवृत्तिवेतनधारक यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पात्र वारसांना सदर सुधारित नियमांनुसार कुटुंब निवृत्तिवेतन लागू करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर असे ठरविण्यात आले की, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती) नियम १९८२ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणांनुसार नगर परिषद यवतमाळ येथील सेवा निवृत्त कर्मचारी / निवृत्तिवेतनधारक यांच्या पात्र वारसांना कुटुंब निवृत्तिवेतन लागू करून थकीत रकमेचा लाभ अधिसूचनेचा दिनांक ०८.०२.२०२४ अदा करावेत. याबाबत येणारा संपूर्ण वित्तीय खर्चास मान्यता देण्यात येते, याकरिता मुख्याधिकाऱ्यानी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश आस्थापना विभाग प्रमुख यांना निर्गमित करावे.

ठराव सर्वानुमते मंजूर.....

(ॲड. प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
**नगराध्यक्ष**
**नगर परिषद यवतमाळ**

स्थायी समीती सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र.५७ ची प्रत
मा.अध्यक्ष महोदया यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय

विषय क्र.५७- नगर परिषद यवतमाळ हद्दीतील वडगांव येथील राणाप्रताप गेटजवळ व भोसा येथे जय भवानी चौक येथे पोलीस चौकी स्थापन करण्याबाबत .

सुचक – श्री.नित्यानंद अशोक गिरी
अनुमोदक – श्री.भारत दिंगाबर ब्राम्हणकर

ठराव क्र.५७ - नगर परिषद यवतमाळ हद्दीतील वडगांव येथील राणाप्रताप गेटजवळ व भोसा येथे जय भवानी चौक येथे पोलीस चौकी स्थापन करण्याबाबत कारण याठिकाणी नागरीकांची वर्दळीचे ठिकाण आहे त्यामुळे याठिकाणी गुन्हेगारी वाढत असल्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्याचे दृष्ट्रीने तेथील नागरिकांची मागणी असल्यामुळे विषय गटनेता श्री.नित्यानंद अशोक गिरी यांनी सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदया यांना विनंती अर्ज सादर केल्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने वेळेवर येणा-या विषयानुसार माहीती कार्यालय अधिक्षक यांनी सभेत सादर केली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चेअंती सर्वानुमते नगर परिषद यवतमाळ हद्दीतील वडगांव येथील राणाप्रताप गेटजवळ व भोसा येथे जय भवानी चौक येथे पोलीस चौकी स्थापन करण्याबाबतच्या प्रस्ताव मा.पोलीस अधिक्षक यवतमाळ यांचेकडे पाठविण्याची कार्यवाही करण्यासंदर्भात विषयास मंजुरी प्रदान करण्यात आली.

यापुढील नियमानुसार कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग यांनी मा.मुख्याधिकारी यांचे आदेशानी करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(ॲड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद, यवतमाळ

स्थायी समीती सभा दिनांक २३/४/२०२६ ठराव क्र ५२ ची प्रत
मा.अध्यक्ष महोद्य यांचे परवानगीने वेळेवर येणारे विषय

विषय क्र. ५२ नगर परिषद यवतमाळ विविध विभागा मार्फत अयोजीत कार्यालयीन व नगर परिषदेची आयोजीत सर्वसाधारण सभा करीता बिछायत व्यवस्था करण्याचे कामास झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी व पुढे याकरीता निविदा प्रक्रीया होईस्तर सुरु असलेल्या कंत्राटदारास मुतदवाढ देवून यावर येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्याबाबत.

सुचक – सौ.निता भास्कर केळापुरे
अनुमोदक – सौ.प्रियंका चेतन भवरे

ठराव क्र.५२ नगर परिषद यवतमाळ विविध विभागा मार्फत अयोजीत कार्यालयीन व नगर परिषदेची आयोजीत सर्वसाधारण सभा करीता बिछायत व्यवस्था करण्याचे कामास झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी व पुढे याकरीता निविदा प्रक्रीया होईस्तर सुरु असलेल्या कंत्राटदार न्यु ताज डि.जे. साऊंड अन्ड मंडप डेकोरेशन यांना मंजुर असलेल्या दरानुसार मुतदवाढ देवून यावर येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्याबाबत विषय मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने वेळेवर येणा-या विषयानुसार माहीती कार्यालय अधिक्षक यांनी सभेत सादर केली.

यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.चर्चेअंती सर्वानुमते नगर परिषद यवतमाळ विविध विभागा मार्फत अयोजीत कार्यालयीन व नगर परिषदेची आयोजीत सर्वसाधारण सभा करीता बिछायत व्यवस्था करण्याचे कामास झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी व पुढे याकरीता निविदा प्रक्रीया होईस्तर सुरु असलेल्या कंत्राटदार न्यु ताज डि.जे. साऊंड अन्ड मंडप डेकोरेशन यांना मंजुर असलेल्या दरानुसार मुतदवाढ देवून यावर येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

यापुढील नियमानुसार कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग यांनी मा.मुख्याधिकारी यांचे आदेशानी करावी.

" करीता ठराव सर्वानुमते मंजुर "

(अ‍ॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके)
अध्यक्ष
नगर परिषद, यवतमाळ